३१



# "थोरले साहेब
## पुण्यस्मृती अभिवादन"

बाळासाहेब संकपाळ

54 Y.C.P 923.60954/SAK
LIBRARY



# "थोरले साहेब
## पुण्यस्मृती अभिवादन"


**बाळासाहेब दि. संकपाळ**



**प्रकाशक** विश्वनाथ अर्जुनराव साळवी
श्रीकृपा प्रकाशन, २०४, अमृत वेल, सहनिवास,
सेक्टर २, ऐरोली, नवी मुंबई - ४०० ७०८.

**मुद्रक** श्री. विजय पाडळे, लक्ष्मी प्रिंटींग प्रेस, बी-२८,
बेसमेंट, गणेश टॉवर, प्लॅटफॉर्म नं.१ च्या समोर,
ठाणे (प.) - ४०० ६०१.
मो.: ९८९२७६३९९८ / ८१०८५०१९२५

**मुखपृष्ठ** :

**अंतर्गत सजावट** : ॲड. राम होगले, संपादक,
साप्ताहिक ''राम प्रताप'' कराड.

**मुखपृष्ठ शिर्षक लेखन** : श्री. विजय पांडुरंग पाडळे

**अक्षर जुळवणी / मुद्रक** : श्री. विजय पांडुरंग पाडळे



923.60954



© सौ. स्मिता प्रशांत संकपाळ,''आश्रय'' विविधा सहकारी गृहनिर्माण संस्था,
ब्लॉक नं.७, सेक्टर-३, प्लॉट सी - ३, ऐरोली, नवी मुंबई - ४०० ७०९.



मुल्य : रू.....

प्रथमावृत्ती प्रकाशन (दि. १२ मार्च २०११)



Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC. NO.: G01495
DATE: 24·01·11

# अनुक्रमणीका


१) प्रस्तावना

२) मनोगत

३) पत्रास कारण कि,

४) स्व. यशवंतरावजींना शंका - समस्या बाबत मार्गदर्शन मागणारे अनुयायी आश्रमातील सामान्य अनुयायांचे परवानगी मागणारे पत्र दिनांक २५ नोव्हेंबर २०१०.

५) अनुयायाी आश्रमातील अनुयायांस शंका - समस्या कळवण्यांस स्व. यशवंतरावजी चव्हाण यांचे परवानगी देणारे पत्र दिनांक ५ डिसेंबर २०१०.

६) अनुयायी आश्रमातील अनुयायाने आपल्या शंका - समस्या कळवून स्व. यशवंतरावजींकडून सुचना - मार्गदर्शनाची अपेक्षा करताना लिहिलेले पत्र १ जानेवारी २०११

७) अनुयायी आश्रमातील अनुयायाच्या शंका-समस्यांना सुचना - मार्गदर्शन करणारे स्व. यशवंतरावजींचे पत्र दिनांक ५ मार्च २०११.

# प्रस्तावना

# मनोगत

१५ ऑगस्ट १९४७ च्या स्वातंत्र प्राप्ती नंतर २६ जानेवारी १९५० पासून स्विकारलेली प्रजासत्ताक राज्य पध्दती अवलंबत राज्याराज्यातून देशाचा विकास आपण अनुभवत आलो. स्वातंत्र्या नंतरच्या वाटचालीत नियोजनाच्या माध्यमातून संशोधन व नवनिर्मीतीतून सामाजीक,सांस्कृतीक, कृषी,सेवाक्षेत्रांत आपण आघाडी घेतली शासन, सामाजीक संस्था, शैक्षणिक, सांस्कृतीक व साहित्यीक व्यासपीठाच्या माध्यमातून बौध्दीक विचारांत भर घालत समाजीक समभाव वृध्दीगंत केला. स्वातंत्र्य प्राप्ती नंतरची विकासाची घोडदौड सातत्याने २५-३० वर्षे कार्यरत ठेवू शकलो. या काळांत अनुभवलेल्या आदर्श व समाजाभिमुख कार्यपध्दतीत राज्यांत व देशांत आदर्शवत नेतृत्व म्हणून मान्यता पावलेले स्व. यशवंतरावजी चव्हाण यांचा राजकीय कार्यकाळ हा सुवर्णकाळ गणला गेला. स्वातंत्र्य प्राप्तीच्या पहिल्या २५-३० वर्षाच्या राजकीय व सामाजीक वाटचालीतील सातत्य राखले. राज्यकर्ते व समाजपरिवर्तेनांत आघाडीवर असलेल्या सेवाभावी, सहकारी शैक्षणिक, सांस्कृतीक संस्थामधील नेतृत्वाने आपल्या महत्वकांक्षेच्या हव्यासापोटी राज्य

व देश प्रगतीच्या संकल्पनेला सोयीनुसार क्रम देण्यामुळे सामाजीक व राजकीय वाटचालीत अप्रीय प्रवृत्ती वाढत गेल्या. २०व्या शतकांत स्वातंत्र्य संग्रामाच्या यशस्वीते बरोबरच सामाजीक, वैज्ञानिक व राजकीय समाजाभिमुख केलेल्या प्रगतीचा विसर पडत गेला. परिणामी विज्ञानयुग म्हणून स्वागत केलेल्या २१ व्या शतकातील प्रवेशापर्यंत समाजजिवन व राजकीय जीवन विकृत झाल्याचा अनुभव राज्य व देश पातळीवर प्रकर्षाने जाणवू लागला.

आज जागतीक स्थरावर स्वार्थ, भष्ट्राचार, दहशतवाद, जातीय व धार्मिक तणाव, वैर वाढून माणसा माणसातील समाजीक, सांस्कृतीक, धार्मीक व राजकीय नितीमत्ता लोप पावल्याचे दुदैवी वास्तव आपण अनुभवत आहोत.

अशा अप्रीय सामाजीक परिस्थीतीत अलिकडे दिवसेदिवस भर पडण्याचे सातत्य अखंड सुरु आहे. २१ व्या शतकाचे पहिले दशक संपवणाऱ्या वर्षात राज्य व देश असंख्य घोटाळ्याच्या संशयांत चाचपडत आहे.

प्राप्तपरिस्थीत सर्वच स्थरावर आपण पुर्ववत प्रगतीच्या व सेवाभावी वृत्तीला अंगीकारुन अनुभवलेल्या सुवर्णकाळाचा प्रारंभ

करुन उगवत्या पीढीला सुसह्य जिवनाचा लाभ व देश विकासाचा मार्ग देणार आहोत कि, नाही? द्यायचा असेल तर कोणता कार्यकाळ आदर्शवत मानून परिवर्तनांत यश मिळवायचे हा प्रश्न समोर आहे.

या समस्येचा शोधबुध्दीने विचार करताना मनांत विचार आला कि, ज्यांच्या सामाजीक व राजकीय जिवनाला आम्ही आदर्श कार्यकाळ मानला त्या स्व. यशवंतरावजी चव्हाण यांना प्रचलीत परिस्थीतीतून परिवर्तन प्राप्तकरण्याकरिता काय अभिप्रेत असाते? याच कल्पनेतून आपल्या प्रचलीत समस्यांच्या निवारण्याकरिता स्व. यशवंतरावजींनी काय मार्गदर्शन केले असावे? असे मार्गदर्शन प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा. याच विचाराने आजच्या कार्यरत समाजकर्त्यांकडे व विद्यार्थी आणि तरुण पीढीला प्रगतीशील राज्य व देशातील समाजजिवन सुसह्य करण्याच्या दिपस्थंभाचा निर्देश करावा हा प्रामाणिक लेखन प्रपंच राज्यातील भावी पीढीकरिता सादर करत आहे. याच बरोबर हा लेखन हेतू साध्य करण्याकरिता राज्यभर व्यापक प्रमाणांत प्रबोधन कार्य सुरु करण्याचा मानस आहे. राज्यातील सांस्कृतिक मुल्यांच्या संस्कारातून या उपक्रमाला नव्या पीढीकडून प्रतिसाद मिळेल असा विश्वास वाटतो.

**बाळासाहेब दि. संकपाळ**

# अर्पण

आपल्या संस्कारातून यशस्वी जीवनाची वाट दाखवणाऱ्या व आपल्या सहिष्णु,धार्मीक,समता, परोपराकारी, विवेक व विचारांच्या अंमलबजावणीने वंदनीय झालेल्या संपूर्ण ''विठाबाळ'' कुटूंबाला प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या माझे स्व. आजोबा आबा स्व. आजी माझे पीताजी दिवंगत आण्णा व आई आणि बुवादादा, ज्ञानू भाऊ खाशा बापू, मारुती आप्पा, बंडूदादा व रामूबापू, थोरली आई रकमाबाई, मुक्ताकाकी, पुतळाताई, थोरलीआई तानूबाई, गंगाकाकी आम्हा भावंडातून अपुरा प्रवास सोडून गेलेली सर्व भावंडं यांना व सर्वांवर प्रेम करणाऱ्या आमच्या आत्यांना आणि ज्यांच्या आदर्श सामाजीक व राजकीय कार्यपध्दतीचा आश्रय घेवून आजवर यशस्वी वाटचाल करु शकलो त्या स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या स्मृतीस अर्पण.

**बाळासाहेब दि. संकपाळ**

# शब्दाशिर्वाद

मा. ना. शरदचंद्र पवार

केंद्रिय कृषी मंत्री

# शब्दाशिर्वाद

मा. ना. पृथ्वीराज चव्हाण

मुख्यमंत्री

# शुभेच्छा

खा. सुप्रीयाताई सुळे

# शुभेच्छा

ना. प्रतिक पाटील

केंद्रीय क्रिडा राज्यमंत्री



## "थोरले साहेब पुण्यस्मृती अभिवादन"

बाळासाहेब संकपाळ

आज राज्य-देश व जागतीक स्थरावर स्वार्थ, भ्रष्टाचार, दहशतवाद तसेच जातीय व धार्मीक वैर वाढून माणसा-माणसातील सामाजिक सांस्कृतीक, धार्मीक व राजकीय नितीमत्ता लोप पावल्याचे दूदैवी वास्तव आपण सर्वजण अनुभवत आहोत. शासन, समाजसेवक, सेवाभावी संस्था सर्वजण आपआपल्या परिने हे दुष्टचक्र नाहीसे करण्याकरिता प्रयत्न करत आहेत. राज्याला स्व. यशवंतरावजी चव्हाण यांचे रूपाने लाभलेले नेतृत्व

व त्यांच्या सामाजीक, राजकीय कार्यपध्दतीची पदोपदी आठवण होत आहे. स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या सामाजीक व राजकीय कार्यपध्दतीवर विश्वास व श्रध्दा असलेल्या त्यांच्या सामान्य अनुयायाने ''आज यशवंतरावजी आपल्यांत असते तर'' प्राप्त परिस्थीतीत आपण सर्वांना सुसह्य व आदर्श जिवन जगण्यासाठी काय मार्गदर्शन केले असते. याबाबत शोधंबुध्दीने यशवंतरावजींना अभिप्रेत असलेले मार्गदर्शन प्राप्त केले आहे. अनुयायाने पत्र रूपाने स्व. यशवंतरावजींना कळवलेल्या आपल्या भावनातून स्व. यशवंतरावजीनी पत्ररूपाने केलेल्या मार्गदर्शनाचे स्वरूप स्पष्ट करण्याचा केलेला विनम्र प्रयत्न ''पत्रास कारण कि'' सादर करत आहे.

# शुभेच्छा

ना. अजित पवार

उपमुख्यमंत्री

# शुभेच्छा

**ना. जयंत पाटील**
**ग्रामविकास मंत्री**

# पत्रास कारण कि,

वडीलधारी मंडळी, उद्याच्या शक्तीशाली भारत देशाचे शक्तीशाली आधार युवक - युवती, माझे सहकारी बंधू भगिनिनो,

देशाच्या स्वातंत्रप्राप्तीत ज्या थोर नेत्यानी व असंख्य कार्यकर्त्यांनी अखंड सायास केले. आपले प्राण खर्ची घातले, त्या स्वातंत्र सैनिकांचे आणि स्वराज्यातील सामान्यांचे जिवन सुखी, सुसंस्कृत, समृध्द, आर्थीक बलवान करण्याकरिता शेवट पर्यंत प्रयत्न करणाऱ्या, नव महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्याची दिशा देणाऱ्या, ज्यांच्यामुळे आपण स्वराज्याची फळे मनसोक्तपणे चाखत आहोत, अशा थोर स्वातंत्र्य सैनिक स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्य स्मृतीचे स्मरण करुन त्यांना अभिवादन.

प्राचिन भारताच्या इतिहासातील ऋषीमुनींच्या तपश्र्चर्या, साधूसंतांच्या ध्यानसाधना, ग्रंथ साधना, संत प्रबोधन, समतेवर आधारीत संस्कृती यातून मिळालेली नात्याची, श्रध्देची, निष्ठेची, भक्तीची, आदरातिथ्याची शिकवण जोपासत आपण जो-जो वांछील तो ते लाहो अशी विश्र्वातील प्राणीमात्राकरीता प्रार्थना

समजून घेतली.

प्राचीन भारत प्रगत होत असतांना घडलेल्या इतिहासात, धर्माकरिता, सत्तेकरिता झालेल्या युध्दांचा इतिहास वाचला. आपल्या संस्कृतीवर आधारीत सहिष्णुता जोपासन्याकरिता कार्यरत झालेल्या समाजसुधारकांचा कालखंड पाहिला. गुलामगीरीत ठेवणारे देशही ऐकले. हळू हळू गुलामगीरीचे हाल आणि स्वतंत्र्याचे मोल समजायाला लागून सुरु झालेला स्वातंत्र संग्राम वाचनात आला. प्रदिर्घ संघर्षानंतर स्वातंत्र्य सुर्य उगवण्याचे भग्य देशा-देशाला मिळू लागले. आपल्या भारत देशातही स्वातंत्र्यकरीता १००-१५० वर्षे संघर्ष करावा लागला. आपण विसाव्या शतकांत १९४७ साली स्वतंत्र झालो. प्रजासत्ताक राज्यसत्ता स्विकारली व आपला विकास करण्याचे काम करु लागलो. आज आपण जगभर गाजावाजा झालेल्या सर्वार्थिने प्रगतीची माध्यमे हस्तगत करणाऱ्या २१ व्या शतकाचे पहिले दशक संपवत आहोत. वास्तविक आजच्या प्रगत २१ व्या शतकाचा पाया २० व्या शतकांतच घातला गेला. इतिहासांतील वाटचाल पाहिल्यावर २० वे शतक सर्वार्थिने प्रगतीचा पाया

घालणारे ठरले. आज जागतीक स्थरावर स्वार्थ भष्ट्राचार, दहशतवाद, जातीय व धार्मीक वैर वाढून माणसामाणसातील समाजिक सांस्कृतीक धार्मीक व राजकीय नितीमत्ता लोप पावल्याचे दुदैवी वास्तव आपण अनुभवत आहोत.

सुसंस्कृत नागरिक व सुसंस्कृत समाज घडवण्यासाठी आशेचा किरण दाखवणारा ''आदर्श'' शोधावा लागेल. असा आदर्श शोधताना मला आपल्याच राज्यांत समाजाच्या उन्नतीकरिता सतत निस्वार्थीपणे कार्यरत राहीलेल्या, संस्कृती, विकास, राजनिष्ठा यात आपल्या कार्यातून आदर्श निर्माण करणाऱ्या अनेक सत्पुरुषांपैकी, देशावर-महाराष्ट्रावर जिवापाड प्रेम करणाऱ्या स्व.यशवंराव चव्हाण यांच्या कार्यपध्दतीचा आदर्श प्रभावी वाटतो.देशासाठी कष्ट घेताना महाराष्ट्राला विसले नाहीत व महाराष्ट्राचा विचार करताना देशाला विसरले नाहीत असे हे प्रभावी व्यक्तीमहत्व राज्याच्या व देशाचा विकास साधताना पदोपदी विकासाच्या दिशा स्पष्ट करुन गेले आहे.

महाराष्ट्राच्या निर्मितीच्या पूर्व संधेला स्व.यशवंतराजीनी नवमहाराष्ट्रच्या आपल्या कल्पना मांडल्या व त्यामुळेच त्यांना

आपण नवमहाराष्ट्राचे शिल्पकार मानतो. महाराष्ट्राचा विकास करताना देशविकासाकडे दुर्लक्ष होवू नये अशी दक्षता घेण्याचे महत्व त्यांनीच आपल्यांत रुजवले. कर्तत्वाला आल्पसा अवधी लाभलेले स्व. मारोतराव कन्नमवार यांच्या रुपाने एक धडधडीचा सहकारी यशवंतरावजींना लाभला. निश्चित केलेला महाराष्ट्राचा आराखडा अमलांत आणण्याकरिता कामावर श्रध्दा ठेवणारे हरीत क्रांतीचे प्रणेत वसंतरावजी नाईक यांच्या सारखे स्वामीनिष्ट सहकारी यशवंतरावजींना लाभले. स्व. वसंतदादा सारखे सहकार शक्तीद्वारे महाराष्ट्राचा विकास साधणारे लोकसंग्रहाचे उत्तम प्रशासक सहकारी यशवंतरावजींना लाभले. महाराष्ट्राच्या अस्मीतेचा खानदानी मराठमोळेपणा जतन करणारे लोकनेते स्व. बाळासाहेब देसाई हे सहकारी यशवंतरावजींना लाभले. सामान्यांचे जिवन सुसह्य करण्याचा शोध घेणारे स्व.वि. स. पागे हे सहकारी यशवंतरावजींना लाभले. बेरजेचे राजकारण हा शब्द यशवंतरावांचा. पण ही बेरीज कोणाची होती ? सर्व क्षेत्रातील व सर्व पक्षातील पारखलेल्या गुणीजनांची ही बेरीज होती. वेगवेगळया गटाचे त्यांच्या आप्तजनांना सत्तेत घेवून केलेली ही

संधीसाधूंची बेरीज नव्हती. गुणवंताला जवळ ओढून आपुलकी देणे हा यशवंतरावांचा गुण होता. यशवंतराव तळमळीच्या आणि कळकळीच्या विरोधी नेत्यांना सांगत की, ''तुम्ही आता नुसते विचार का मांडता? सत्तेत सहभागी व्हा आणि तुमचे विचार अमलांत आणा. यशवंतरावाचे बेरजेचे राजकारण म्हणजे मात्तब्बर गुणी नेत्यांची बेरीज होती. या नेत्याना यशवंतरावजीनी घडविलेही. यशवंतरावांचे मन मोठे होते. गुणांची पुजा ही त्यांची कार्यपध्दती होती. दान करावे गुप्तपणे. घरी आलेल्याचा सत्कार करावा. कुणाचे भले केले तरी उच्चार करायचा नाही. उपकाराची वाच्यता करायची नाही. संपत्तीचा अहंकार नाही आणि दुसऱ्याचे अपयश किंवा अपकीर्ती याचा उल्लेख करायचा नाही. हा यशवंतरावजीचा स्वभाव होता. श्रवण करुन मनन करावे मनन करुन चिंतन करावे आणि चिंतनाचे आचरण करावे ही यशवंतरावजींची कार्यपध्दती होती. जातीधर्माचा विचार करताना सर्वच धर्मपुरस्कर्त्यांनी सहिष्णुतता, मानवता आणि समता याचा समाजजिवनाकरिता केलेला उपदेश मान्य करावा असा यशवंतरावजींचा आग्रह होता. म्हणूनच त्यांनी जातीच्या

नावाखाली उच्च-निच भेद मानला नाही. याकरिता समाजांत समतेचा मंत्र रुजवण्याचा यशवंतरावजीनी अखंड प्रयत्न केला. तुमचे राज्य मराठा की मराठी? असा प्रश्न केला आसता ''हे राज्य मराठी आहे'' या तात्काळ उत्तराने त्यांच्या मनातील समता स्पष्ट केली. नेतृत्वाची दुसरी फळी उभी करा अशी त्यांना कोणी विनवणी केली नव्हती. यशवंतरावजीनी प्रोत्साहन देवून, मार्गदर्शन करुन अनेक कार्यकुशल समाजसेवकांची फळी उभी केली आहे. आज अशा नेत्यांचे मार्गदर्शन व त्यानी चालवलेला राज्याचा कारभार हा यशवंतरावांच्या दूरदृष्टीचा ठेवा आहे. ''समाजवादाचा'' पाळणा प्रथम महाराष्ट्रांत हलेल'' ही मावळत्या सुर्याला साक्ष ठेवून, प्रतिज्ञा करुन यशवंतरावांनी अंधारांत खितपत पडलेल्या बहुजन समाजाला प्रकाश दिला. यशवंतरावजीना सत्तेचा लोभ नव्हता. त्यांना सत्ता हवी होती विकास साकार करण्यासाठी. तळागाळातील सामान्यांच्या उध्दारासाठी. यशवंतराव म्हणजे महाराष्ट्राची मुर्तीमंत संस्कृती होती. तत्वाशी अजीबात तडजोड न करताही नेमस्त पण यशस्वी राजकारण कसे करता येते, याचा यशवंतरावजींची कारकिर्द हा

आदर्श वस्तूपाठ होता. ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, देशाचे संरक्षणमंत्री, गृहमंत्री, परराष्ट्रमंत्री, अर्थमंत्री, उपपंतप्रधान होते. त्यांच्या मागे उत्तमोत्तम पुस्तके आहेत. ही पुस्तके सगळयांना उपलब्ध व्हावीत अशी सोयही त्यानी करुन ठेवली आहे. म्हणून आज स्व. यशवंतरावनी आपल्या कार्यकाळांत राबवलेल्या समाजाभिमुख कार्य पध्दतीचा प्रस्तापीतांकडे आग्रह धरणे गरजेचे आहे.

नव महाराष्ट्राचे शिल्पकार, थोर स्वातंत्र्य सेनानी, लोकाभिमुख राजकारणी, मुत्सदी, सुसंस्कृत लोकाग्रणी, विचारवंत, बुध्दीमान, कर्तत्वान आणि कष्टकरी - साहित्यीक व कलावंत इत्यादी वर्गाचे पाठीराखे, जन्माने देवराष्ट्राचे व कर्माने राष्ट्राचे झालेले नव महाराष्ट्राचे शिल्पकार, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, स्व. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र निर्मीतीच्या पुर्व संधेला नव- महाराष्ट्राच्या विकासाचा आराखाडा सर्वासमोर मांडला होता. त्या आराखड्याच्या दिशेने आपण वाटचालही सुरु केली. त्याचीच फळे म्हणून महाराष्ट्र आज समाजीक, औद्योगिक, शैक्षणिक, सांस्कृतीक, सहकार, कृषी क्षेत्रांत अग्रेसर

व संपन्न आहे. तथापी या प्रवृतीला गेल्या २५ वर्षापासून आपसातील राजकीय वितंडवादातून राज्याच्या विकासाचे लक्ष दुय्यम दिसू लागले. देश व जागतीक पातळीवर थैमान घालणारा विध्वंस, भ्रष्टाचार, आतंकवाद, धर्मवाद, जाती-जातीचे पुर्नजिवन इत्यादी कारणाने समाजाभीमुख विकास आणि राष्ट्रवादाकडे लक्ष द्यायला कोणाला वेळ मिळत नाही. अशा परिस्थीतीत आपले राज्य आणि देश कोणत्या दिशेने जात आहे हे पहातांनाप्रत्येकजण चिंतेत आहे.

नवमहाराष्ट्र निर्मीतीची कल्पना मांडताना स्व. यशवंतरावजींनी राजकीय अर्थिक व नवबौधांचा, महाराष्ट्राच्या विविधतेचा प्रश्न सोडवण्याकरिता. आपले विचार सर्वासमोर ठेवले. त्यात त्यांनी भावनात्मक प्रश्न सोडवण्याकरिता सांगीतले, आपले मराठी बांधव वर्षानुवर्षे आपल्या पासून दुरावले होते. विदर्भ व मराठवाडा यांच्या मनातला संशय आहे त्यांना भावनेने आमच्याशी एकरुप होता येईल असे वातावरण निर्माण करायचे आहे. मराठवाडा मराठी माय बोलीचे माहेर, तेथे मराठी भाषा रांगली-चालतीबोलती झाली तो मराठवाडा १००-१५० वर्षे

मोगलाईत पडला होता. मध्यप्रदेशांत वऱ्हाड जावून पडले होते. हे बांधव तेथील परंपरेत, भावनांच्या आवरणांत व तेथील प्राश्र्वभूमीत वाढले. त्यांना आपण आपुलकीने, प्रेमाने जवळ घेतले पाहीजे. मेहरबानी म्हणून नव्हे तर तो त्यांचा हक्क आहे म्हणून. सामाजीक प्रश्ना बाबत त्यांनी सांगीतले, महाराष्ट्राच्या सामाजीक जिवनासंबंधी अनेक विचारवंतांची चिंता व्यक्त करुन त्याचे वर्णन ''भंगलेले मन असे केले होते. महाराष्ट्राच्या मागणीच्या पाठपुरावा करताना आमचा एक आवाज एक मन यासारखे ऐक्याचे दर्शन नाही. हे एक दिसणारे मन-ऐक्य संयुक्त महाराष्ट्र येतो आहे म्हटल्यावर शंकेने भरले ते भंग पावलेले मन आपणांस सांधावयाचे आहे. प्रत्येक जण आपल्या जातीवर आधारीत विचार करत आहे. जातीयवादाच्या या विषारी विचारापासून महाराष्ट्राला मुक्त केले पाहिजे तरच महाराष्ट्राचे मन एकजिनसी होईल. जातीय वाद प्रत्येक जातीत असला तरी आपण विचारपूर्वक ७०-८० वर्षे राष्ट्रवादी भावनेला वाहून घेतलेली माणसे आहोत. म्हणून हे विचार मनांत आणू नका. निवडणूकीच्या माध्यमातून बहुजन समाज पुढे येत असता गुणांची अवहेलना होणार की काय? अशी शंका आणू

नये. शंका घेवू नका गुणांची पुजा होणे-मेरीटचे महत्व ठेवणे गरजेचे आहे. आणि तो आपला निर्धार आहे. संख्या बळाच्या जोरावर कोणाला मागच्या बाकड्यावर बसण्याची वेळ येणार नाही. नव बौध्दाचे प्रश्न मांडताना स्व. यशवंतरावजीनी सांगीतले डॉ. आंबेडकरानी अस्पृष्य म्हणून वावरलेल्या समाजांत नवी जागृती निर्माण केली व अनेक बुध्दीमान व विचार करणाऱ्या कर्तृत्वान तरुणांचा नवा वर्ग तयार केला. जो समाज तुमच्या आमच्याबरोबर समाजांत वावरला. त्या समाजाचा स्वाभीमान जागृत झाला आहे. या समाजातील बुध्दीमान, कर्तृत्ववान मंडळींना सहभागी करुन घेतले पाहीजे. त्यांना सहानुभुती नको आहे. त्यांना हक्क हवा आहे. नवा महाराष्ट्र कर्तृत्वान हातानी घडवायाचा असेल तर जुना राग, द्वेष दूर करावाच लागेल. त्यांच्या मनांत भागीदारीची भावना निर्माण करुन समरसता निर्माण करावयाची आहे. शेतीच्या प्रश्नाबाबत सांगताना स्व. यशवंतरावजी म्हणाले की, सर्वांच्या शेतीच्या समस्या समजून घेताना शेतकरी म्हटले की सारख्या समस्या न मानता भौगोलीक विचार करुन वास्तव समस्यांचे निराकरण करण्याचा आपला

निर्धार आहे. बियाने-खते-पाणी आणि नवीन तंत्र विभागनिहाय फळबागांचा विचार. हे सर्व प्रश्न सोडवताना एकजिनसी कार्यकर्त्यांची सेना आपणांस उभी करायची आहे.

स्वातंत्र संग्रामात तरुणाने पारतंत्र्याविरुध्द आहुती दिली. आजच्या तरुणाला स्वातंत्र्यांत अभिप्रेत असलेली फळे मिळणे दुरापास्त झाले आहे. स्वातंत्र्य संग्रामातील तरुण स्वातंत्र्यासाठी बेभान झाला होता. त्यावेळचा तरुण व आजचा तरुण हा याच भारतमातेचा भुमीपुत्र. मग आजच्या तरुणाला समाजविरोधी कृत्यांना प्रखर विरोध करण्याची उर्मी का दिसत नाही ?

सरकारी व इतर उपक्रमातील रास्त महसूल रास्त ठिकाणच्या तीजोरीत जात नाही ही शोकांतीका आहे. म्हणून आजच्या संघटीत तरुणांच टोळकं प्रत्येक कार्यालयाच्या आवारांत रास्त महसूलाच्या आड येणाऱ्या आधिकाऱ्यांस समाजापुढे आणण्यांस सज्ज होणे गरजेचे आहे.

नवमहाराष्ट्रच्या उज्वलतेसाठी स्व. यशवंतरावजीनी दाखवलेच्या आराखड्याप्रमाणे आपण आपल्या विकासाच्या दिशा ठरवल्या आणि कार्यरत झालो. सामान्य माणूस सुध्दा

कारखान्याचा, दुध संघाचा, बँकेचा, सोसायटीचा, खरेदीविक्री संघाचा मालक होवू शकतो हे वास्तव साकार केले आहे. शिक्षणाचा प्रसार करुन शिक्षण घेवून नोकरी करणे व निवृत्तीकाळ व्यतीत करणे ही परकीय राजवटीतील मानसिकता बदलू शकलो. शैक्षणीक प्रसार तळागाळापर्यंत पोहचवून नवनवीन उद्योगाला व प्रशासनाला सक्षम स्थानिक तंत्रज्ञ व प्रशासक निर्माण करु शकलो. शैक्षणीक प्रसारमुळे आज आपले तरुण जगाच्या पाठीवर आपले योगदान देवून कर्तत्व दाखवत आहेत. सार्वजनीक उपक्रमातून सामान्यपर्यंत सेवा देणारे समाजवादावर आधारीत, आपण निवडलेल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून राज्याला शासन देवू शकलो. सत्तेचे विकेंद्रीकरण राबवून ग्रामपंचायत, नगर पालिका, महानगर पालिका, जिल्हा परिषदा, सहकारी संस्था इत्यादीच्या माध्यामातून आमचा प्रतिनिधी सर्वांच्या विकासाचा निर्णय घेवू लागला. यातूनच समाजासाठी विधायक काम करणाऱ्या समाजसेवकांची आपण फौज निर्माण करु शकलो या प्रक्रियेतून घडलेले नेते आज राज्यात व केंद्र शासनांत आपले प्रतिनिधीत्व करत आहेत. आपण लोकशाही प्रणालीतून हे सर्व साध्य केले पण

अशा लोकाभीमुख कारभाराला द्वृष्ट लागून, आज स्वार्थ, भ्रष्टाचार, जातीय, धार्मीक वैर वाढून समाजांत संभ्रमाची अवस्था निर्माण झाली आहे.

नवमहाराष्ट्र निर्माण करताना महाराष्ट्राचे प्रश्न सोडवायचे असतील तर त्याचे स्वरुप नीट समजावून घेतले पाहिजे. प्रगतीसाठी जे करायचे आहे त्याचा आराखडा समोर ठेवला नाही तर आंधळ्यासारखा प्रवास करण्याचा आमच्यावर प्रसंग येईल. हा प्रवास योग्य दिशेने व निश्चीत गतीने पुरा करायचा आहे. प्रगतीच्या या प्रवसांत आमची राष्ट्रनिष्ठा आणि महाराष्ट्र निष्ठा या एकमेकांच्या हातात हात घेूवनच आपल्याला विजय मिळवायचा आहे हे सांगतानाच कर्तुत्ववान परंपरा असणाऱ्या, शिवाजी महाराजांच्या परंपरेने शोभायमान झालेल्या महाराष्ट्राचा इतिहास अडून बसणार नाही. जीवनाची जी मुल्ये आम्हाला आमच्या पंरपरेतून मिळालेली आहेत त्यांच्या बळावर मानवी जीवनाची सेवा करण्यातही तो मागे हटणार नाही असे एक स्वप्न स्व. यशवंतरावजींनी महाराष्ट्रच्या भवितव्याबाबत सांगीतले.

आज सबंध देश विध्वंसाच्या आगीत सापडला आहे.

महाराष्ट्रातही ती आग भडकली आहे. ही आग विझवण्यासाठी पाणी आणावे लागेल महात्मा जोतीबा फुल्यांच्या हौदातील, शाहुमहाराजांच्या पंचगंगेतून, आंबेडकरांच्या स्पर्षाने पुनीत झालेल्या महाडच्या चवदार तळ्यातून आणि या तिन्ही ठिकाणाहून आणलेल्या पाण्यांत सोडावी लागेल साने गुरुजींनीं प्रेमासाठी आयुष्यभर ढाळलेल्या अश्रुंची धार, असे हे पाणी ही आजची आग निश्चीत विझवू शकेल. याला आमच्या निश्चयाची गरज आहे.

स्व. यशवंतरावजीनी प्रगतीच्या प्रवासांत सामाजीक,आर्थीक व औद्योगीक प्रश्न सोडवताना शिक्षण आणि शेतीला प्राधान्य दिले. याच बरोबर दोन वेळची चुल पेटली नाही तर झोपताना येणारी भूकेची कळ अनुभवल्याचा दाखला देवून दारीद्र्य नष्ट करण्याचा कार्यक्रम प्राधान्याने राबवला. सर्वांना शिक्षण योजना राबवताना शाळा-कॉलेजबरोबर वसतीगृहांची सोय केली. शिक्षणाची खैरात पाहून काही बुध्दीवंतानी शैक्षणिक दर्जा खालावण्याची भीती व्यक्त करुन कडक पेपर तपासणीचा आग्रह धरल्यावर यशवंतरावजीनी त्यांस विरोध करताना सांगीतले, आता कोठे ज्यांना शाळेत जाता येत आहे. त्यांना

नाउमेद करु नका. तरीही शिक्षणामुळे तरुण बंडखोरीकडे वळेल या विद्वानांच्या भाकीताला यशवंतरावजी सांगीतले, भविष्यांतील तरुणांचे बंड हे देशाच्या प्रगतीला उपकारच ठरेल, त्याची काळजी करणे म्हणजे समाज सुधारणेला खीळ घातल्यासारखे होईल.

स्व. यशवंतराव भारताचे गृहमंत्री असताना लोकसभेत देशांतर्गत झालेल्या दंगलीची चर्चा चालली होती. या चर्चेत एका सदस्याने आपल्या भाषणांत स्वातंत्र्य संग्रामातील चळवळीत तत्कालीन शासनाच्या विरोधात काम केलेल्या व आरोपी होऊन तुरुंगावास भोगलेली व्यक्ती आज देशाची गृहमंत्री आहे असे उद्गगार यशवंतरावजीच्या रोखाने काढले. या संबंधी यशवंतरावजींनी दिलेल्या उत्तरात स्वातंत्र्य संग्रमातील चळवळीत भोगलेल्या तुरुंगवासाची तत्कालीन परीस्थिती निर्माण झाल्यास देशवासीयांच्या हक्काच्या आड येणाऱ्या घटाकांसी तेच वर्तन करुन पुन्हा तुरुंगवास भोगण्यास मी कटीबद्द आहे असे उदगार काढले होते. आजच्या तरुणाला आज स्वतंत्र्य भारतातील सामान्य जर पारतंत्र्यासारखी समाज शोषनाची परीस्थिती अनुभवत असेल तर त्याने आजच्या समाजविरोधी कार्यप्रणालीच्या विरोधात

आंदोलन करुन प्रसंगी स्वातंत्र्य संग्रामातील तुरुंगवासाप्रमाणे आजही तसाच प्रसंग आला तर तो आनंदाने स्किारला पाहिजे हा बोध घेणे गरजेचे आहे. मित्रहो उद्याचा सुशिक्षित तरुण बंडखोर होईल या विद्वानांच्या भाकिताला स्व. यशवंतरावजींनी दिलेले उत्तर कालांतरानी लोकशाहीतील समाजविरोधी शासनाच्या विरोधातील गरज असलेले तरुणांचे बंड व्हावे हा दुरगामी संदेश आज प्रत्यक्षात आणण्याची वेळ आलेली आहे.

वाईटाचा त्याग करुन चांगल्याचे जतन करत विकासाच्या नव्या संकल्पना करण्याची आमची संस्कृती आहे. २१ व्या शतकातील संपलेल्या १० वर्षाचा काळ हा पुर्व प्रभावाचा मानू व २१ व्या शतकातील नव्या संकल्पणाचा शुभारंभ करुया. स्वातंत्र्य संग्रामांत ज्यांनी योगदान दिले त्यांची नांवे अभिमानाने सांगताना एक गोष्ट लक्षांत घेणे गरजेचे आहे. ते म्हणजे हे सर्वजण तरुण होते. स्वातंत्र्य असो अथवा स्वातंत्र्यातील रास्त मागण्या असो तरुणांनी मनांत आणले तर कर्त्यासवरत्या शक्तीला रास्त मार्गावर आणने अशक्य नाही. हे स्वतंत्र्यसंग्रामाने सिध्द केले आहे.

आजच्या वैज्ञानीक युगांत जगातील प्रत्येक देश आपल्या

विकासाच्या दिशा ठरवून प्रभावीपणे कार्यरत झाल्याचे आपण ऐकत आहोत. युरोपमधील देश एकत्र येवून सामुहिक आराखड्याप्रमाणे आपला सामुहिक विकास करण्याचा प्रयत्न करत आहेत. चीन सारख्या मोठ्या लोकसंख्येचा देश विकासाची निश्चीत दिशा ठरवून कठोर अमंलबजावणीच्या माध्यमातून आज जागतीक पातळीवर आपले स्थान वरच्या क्रमांकावर आणत असल्याचे आम्ही ऐकत आहोत. लोकसंख्येच्या पातळीवर चीन सर्वात आघाडीवर होता तो आपली लोकसंख्या कमी होत असल्याचे अनुभवत आहे. निश्चीत आराखड्यातून कठोर अमंल बजावणीद्वारे विकास साधता येतो हे इतिहासावरुन व आजच्या जागतिक परिस्थीतीवरुन आपण पहात आहोत.

हे चित्र पाहील्यावर आम्ही लोकशाही राज्यपध्दतीत अग्रगण्य मान ल्या जाणाऱ्या आमच्या देशांत प्रांतवाद, विभागवाद, जिल्हावाद, जातीवाद, धर्मवाद, राजकीय पक्षातील वाद जोपासण्यांत आघाडीवर आहोत हे पहाता वैज्ञानिक युगाच्या सुखसोयी उपभोगताना आम्ही चांगले धडे घेणार आहोत की नाही हा प्रश्न उभा राहतो. म्हणून समतेवर आधारीत समाजवादी-

समाजरचना अमलांत आणण्याकरीता एकच विचार-एकच ध्येय एकच मार्ग अवलंबयाकरिता सर्वांचा एकत्रीत प्रवास सुरु करावयाचा आहे.

आज समाजातील सामान्य घटक ७/१ २ च्या उताऱ्याला नडतो, वीज मंडळाच्या बीलाबाबत अडखळतो, एस.टी.च्या प्रवासाला वंचीत होतो, रेशन कार्डाला रखडतो, बँकेच्या कर्जाला अनेकांना विनवणी करताना दिसतो, शेतीच्या सुविधा करिता अनेकांना विनवन्या करतो, आपला ऊस कारखान्याने वेळेवर तोडावा म्हणून मान्यवरांचे हुंबरे झिजवतो, आपले पैसे वेळेवर मिळावे म्हणून प्रतिक्षा करतो, गावच्या विकासाच्या गोड आश्वासने पुन्हा - पुन्हा ऐकून मूळ अवस्थेत पुढच्या आश्वासनाची वाट पाहतो, मुलाला - मुलीला शाळेत प्रवेश मिळावा म्हणून मनाविरूध्द पण पर्याय नसल्याने खिसा खाली करतो, शिक्षीत उमेदवारांसाठी नोकरी मिळवून पगार मिळण्याकरिता स्वत: जवळची संपत्ती गहाण ठेवतो, मान्यवरांच्या सत्कार सोहळ्यासाठी झिजतो व स्वत:ला धन्य समजतो. तरीही या अडचणीतल्या घटकाला दिलासा देणाऱ्या शब्दाशिवाय त्याला काहीही मिळत नाही.

देशाला स्वातंत्र मिळावे व आपला विकास आपण करावा व समाजवाद, सर्वसमभाव, सहिष्णुतता व शांतीमय समाज व्यवस्था निर्माण व्हावी या मूळ हेतूने अनेकानी अनेक सायास करुन मिळवलेले स्वातंत्र्य आपण खरोखरच उपभोगतो आहोत का याचा विचार करण्या करिता बौधीक विचार वाढवून वैचारिक उठाव करण्याची वेळ येवून ठेपली आहे.

काल हा इतिहास आहे. उद्या हे कोडे आहे व आज ही देणगी आहे. आपल्या या नवक्रांतीच्या वैचारिक परिवर्तन मोहीमेत आजच सहभागी व्हा. कालांतराने मी याच विचारांचा होतो ही जाहीरांत आपली मूळ निष्क्रीयता झाकू शकणार नाही.

सुशिक्षीत व राष्ट्रप्रेमी तरुणांच्या समाजाभिमुख बंडाची हीच वेळ आहे. म्हणून तरुणांनो जागे व्हा, आज सामाजिक, आर्थिक दृष्ट्या अस्थीर समाजात आदर्शवाद जोपासताना त्रासदायक परिस्थितीला सामोरे जावे लागेल, आवाहनाला प्रतिसाद देताना, स्वतःच्या अस्तीत्वाचा त्याग करावा लागणार आहे. पण अशा परिस्थीत आपण या मोहीमेत सहभागी झालात तर ही मोहीम उच्च त्यागाची व अपेक्षेहून अधीक तीव्र होईल असा

विश्वास वाटतो. आज सर्वात अधिक निकड कशाची असेल तर ती देशातील प्रत्येक व्यक्तीच्या वृत्तीत बदल घडवून आणण्यासंबंधीची आहे. आपल्या तरुण मंडळीना याची जाणीव नसेल तर ती करुन द्यावी लागेल. तरुण माणसे त्यांच्या कामांत व्यग्र असली तरी राष्ट्रकार्यासंबंधीच्या त्यांच्या भावना तीव्र असतात हा यशवंतरावजीनी आपला अनुभव सांगून ठेवला आहे. तरुणांच्या बाबतीत आपले कर्तव्य काय असेल हे स्पष्ट करताना त्यांनी सांगीतले, आपण तरुणांबरोबर बसले पाहिजे, त्यांच्याशी बोलले पाहिजे, त्यांना निरनिराळ्या गोष्टी समजावून सांगीतल्या पाहिजेत. त्यांच्यातील उत्तमोत्तम माणसे हुडकून काढली पाहिजेत आणि त्यांची विधायक शक्ती विधायक कार्याला लागेल अशा प्रकारचे कार्यक्रम आपण त्यांना दिले पाहिजेत. असे झाले तरच राष्ट्राने आपल्यापुढे ठेवलेली ध्येये साध्य करण्यांस आपण त्यांना उद्युक्त करु शकू. वयच नव्हे तर आपल्यापुढील आव्हान स्विकारुन त्याला तोंड देण्याची कुवत हे तारुण्याचे गमक असल्याचे स्व.यशवंतरावजींनी मानले होते. तरंणांनो याकरिता प्रबोधन शिबीरांत सामील होवून ही मोहीम प्रभावी करण्याकरिता

नेतृत्व करा. समस्यांना आत्मविश्वासाने सामोरे जाण्याचे धैर्य नव्या पिढीने यशवंतरावांच्या सहह्यदयतेने, अभ्यास वृत्तीने दाखवावे. यशवंतरावांच्या एकाग्रतेने प्रत्येक समस्येचे मनन, चिंतन करावे. यशवंतरावांच्या तर्कशुध्द विचारपध्दतीने स्वत:चे निष्कर्ष काढावेत. यशवंतरावांच्या ध्येयनिष्ठेने व सिद्दीने हे निष्कर्ष व्यवहारात आणावेत. यशवंतरावांच्या भक्तीभावाने समाजाची आणि मातृभूमीची सेवा करावी.

आजचा महाराष्ट्र वैभवशाली इतिहासाची परंपरा राखत वैज्ञानिक युगात सांस्कृतीक, सामाजिक, औद्योगिक, कृषी, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात आघाडीवर आहे. तथापी स्वार्थीने देश विघातक प्रवृत्ती या सगळ्याचा, तुमच्या प्रीय महाराष्ट्राला, सुराज्याची चव चाखू देत नाहीत म्हणून तुम्ही दाखवलेल्या दिशेने सुखी-समृध्दी समतेवर, आधारीत महाराष्ट्र कार्यरत करण्याचे व हे करत असता प्रसंगी स्वातंत्र्य संग्रामातील चळवळीत तुम्ही झेललेले आघात घेण्याचे आम्ही आमचे ध्येय ठरविले आहे.यशवंतरावजी आम्हाला बुध्दी द्या., सामर्थ्य द्या, आशिर्वाद द्या. तुमच्या आशीर्वादाने वैचारिक परिर्वतनाच्या

मोहिमेतील माध्यमातून राबवण्यात येणाऱ्या कार्यक्रमात मनापासून योगदान देत असलेल्या तरुणांना निश्चत केलेले ध्येय साकारण्याचे सामर्थ्य लाभेल याचा मला विश्वास वाटतो.

स्व. यशवंतरावजी आज आपल्यात असते तर काय मार्गदर्शन केले असते याबाबत अध्ययन आश्रमातील सामान्य अनुयायने प्राप्त परिस्थीतीत कोणत्या कार्यक्रमाला प्राधान्य द्यावे याबाबत स्व. यशवंतरावजींना अभिप्रेत असलेल्या सुचना मार्गदर्शनाच्या स्वरूपांत मिळवल्या आहेत. अनुयायी आश्रमातील सामान्य अनुयायाने स्व. यशवंतरावजींना पाठवलेल्या पत्रातून व स्व. यशवंतरावजीनी पत्र रूपाने दिलेल्या उत्तरातून दिसून येतील.

**प्रीत संगम**

**कराड** — **आपला**

**दिनांक : २५/११/२०१०** — **धाकटा बाळ**

# शुभेच्छा

आ. बाळासाहेब पाटील
कराड

# शुभेच्छा

खा. गोविन्दराव आदिक
श्रीरामपूर



# "थोरले साहेब
## पुण्यस्मृती अभिवादन"

*बाळासाहेब संकपाळ*

स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेणाऱ्या पिढीने स्वराज्याचे सुराज्यात रुपांतर व्हावे हे स्वप्न पाहिले. आजच्या वैफल्यग्रस्त समाजमनाला सुसंस्कारीत परिवर्तनाची गरज वाटते. सामान्यांचे जीवन सुखी, समृध्द व आर्थिक बलवान करण्याकरीता थोर स्वातंत्र्य सेनानी स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, कृषी, औद्योगिक व सहकार या क्षेत्रात काम करताना दिलेले राजकीय आदर्श आजही देशाला गतवैभव

मिळवून देण्यास उपयुक्त ठरतील. स्व.यशवंतरावजींच्या राजकीय आदर्शात राष्ट्रप्रगतीची शक्ती आहे. पण आज स्व.यशवंतरावजींचे आदर्श सामाजीक व राजकीय जिवनात जोपासले जात नाहीत. जोपसण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना समाजाची व सर्व क्षेत्रातील व्यवस्थापनांची साथ मिळत नाही. हेच सध्य स्थितीतील अधोगतीचे कारण ठरते. आज स्व.यशवंतरावजी हयात असते तर आम्हाला काय मार्गदर्शन केले असते हे आजच्या पिढीला विशेषत: तरुण पिढीला समजणे गरजेचे वाटते. स्व.यशवंतरावतींच्या राजकीय आदर्शावर श्रध्दा व विश्वास असणाऱ्या त्यांच्या सामान्य अनुयायाने स्व.यशवंतरावजींना आजच्या परिस्थितीबाबत अभिप्रेत असलेले उपाय व विचार पत्र रुपाने मिळवण्याचा प्रयत्न केला आहे.

'थोरले साहेब-पुण्यस्मृती अभिवादन' लेखमालेतील स्व. यशवंतरावजी यांना सद्यस्थितीबाबत समस्या कळवून मार्गदर्शन मिळण्यासाठी त्यांची परवानगी मागणारे पत्र आज सादर करत आहे.

# शुभेच्छा

सरचिटणीस

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# शुभेच्छा

व्यवस्थापक

सौ. वेणुताई चव्हाण ट्रस्ट, कराड

**धाकटा बाळ**
अनुयायी आश्रम, विरंगुळा परिसर,
कृष्णा काठ, कराड, जि सातारा,
महाराष्ट्र, भारत.
पि.-०२५०११०१९८५०
दिनांक : २५/११/२०१०

प्रति,
वंदनीय सर्वपीतृ प्रमुख 'साहेब'
''विरंगुळा'' इंद्रप्रस्थनगर,
कराड आळी, कृष्णाकाठ शेजारी,
जि.ध्रुवतारा, तारांगण महाराष्ट्र,
नभांगण भारत,
पिन कोड नं. ०११९८५०२५०११.

पुण्य स्मृतीस अभिवादन,

आज हे छोटेसे पत्र आपल्यापुढे अभिप्रायासाठी असलेल्या असंख्य देशातील, अनेक क्षेत्रातील मान्यवरांच्या असंख्य प्रबंधांच्या ढीगांत आपल्या स्पर्शाची व नजरेची प्रतिक्षा करत असणार ही या आपल्या अभ्यासीकेतिल स्थितीचा मुखपट माझ्या डोळयासमोर वारंवार येत आहे. हे पत्र उघडून वाचायला सुरुवात करण्यापूर्वी आणांस काय वाटेल याबाबतची माझी

कल्पना माझ्या मनपटलावरुन सरकत आहे. या नमूद केलेल्या कल्पना खऱ्या असल्याबद्दल आपण मला पुढील पत्रांत कळवाल असा मला विश्वास वाटतो.

वर नमूद केलेल्या माझ्या मनांतील कल्पनापैकी मोजकी परंतू प्रमुख बाब जाता-जाता सांगतो व पुढील पत्र प्रपंच समोर ठेवतो. हे पत्र आता आपल्या हातांत आहे. पत्र कोणी पाठवले आहे हे आपण प्रथम पहाता आहांत. यावर प्रेषक : धाकटा बाळ, अनुयायी आश्रम, विरंगुळा परिसर, कृष्णाकाठ, कराड इतकेच वाचल्यावर आपण प्रत्यक्ष पत्र वाचायला सुरवांत केली आहे. आणि खरंच आहे म्हणा ! या आमच्या अनुयायी आश्रमातील प्रत्येक सेवकाने आपले अध्ययन कशा प्रकारे सुरु ठेवले आहे यावर आपण इथल्या वास्तव्यात जीतके लक्ष देत असत व मार्गदर्शन करत असत हे ध्यानांत घेता उद्याचा 'शक्तीशाली भारत' या तुमच्या कल्पनेला पुरकता देण्याला या आश्रमातील प्रत्येक अनुयायी उपयुक्त ठरणार आहे हे आपण जाणून होता. तुम्हाला प्रिय असलेला व इथल्या वास्तव्यांत देशसेवा म्हणजे नेमके काय याचा वास्तूपाठ देताना आपण या अनुयायी आश्रमावर फार प्रेम केलेत व त्यासाठी आपल्या कर्तव्यकार्यातून

जाणीवपूर्वक वेळ दिलात. आमच्या या अनुयायी आश्रमाला आपण घालून दिलेल्या प्रथेप्रमाणे इथले अध्ययन संपल्यावर ''तुमच्या महाराष्ट्राला, तुमच्या उद्याच्या शक्तीशाली भारताकरिता'' ठरलेली उज्वलता वास्तव्यात आणण्याचे मार्ग अबलंबण्याकरिता प्रत्येक परिपूर्ण अनुयायांनी आश्रमातून बाहेर पडण्याची प्रथा आपल्या इथल्या वास्वव्यात सुरु होती तशीच आजही सुरु आहे. मी अनेक जाणत्या अनुयायाबरोबर बोटाला धरुन अंगावरच्या अपुऱ्या कपड्यांत या आश्रमांत वावरतांना वयाने लहान असल्यामुळे ''जरा वय वाढल्यावर येथे ये'' म्हणून अनेकाकडून ऐकूनही येथेच घुटमळत रहात असे. मला अध्ययनक्रम योग्य वयात सुरु करता आला व आज मी इथला सर्वासारखाच एक अनुयायी म्हणून अध्ययन करत आहे. असो. अनुयायी आश्रमातील बारीकसारीक बाबींची तुम्हाला आठवण करुन देण्याचा मी अकारण मजकूर प्रस्तृत करत आहे. कारण यातील इंतंभूत माहीती तुम्हाला आहे कारण हा उपक्रम तुम्हीच राबवलांत व तो आमच्यासाठी ठेवला आहांत. म्हणून ''नमनाला घडाभर तेल'' ही उक्ती वापरुन आपण सर्व अनुयायांना भानावर आणत याची आठवण ठेवून मी आता माझ्या मुख्य पत्रहेतूकडे

वळतो.

प्रथम आपल्या अनुयायी आश्रमातील मी कोण हे स्पष्ट करावे वाटते. आठवण करा. साहेब आश्रमाच्या प्रवेशद्वाराच्या आतल्या बाजूला असलेल्या कट्याच्या कडेला उभा रहाणारा आईने ग-म-भ-न मुळाक्षरे, क,ख,ग बाराखडी व उभा एक आडवे दोन अंकगणिताचा दिलेला गृहपाठ पुरा करुन रोज कोणातरी जाणत्या अनुयायांबरोबर लहान परंतु नेहमी येणारा मुलगा या समजुतीने द्वारपालाने न हटकलेला,'' भविष्यांत अनुयायी होवू इच्छिणारा, निर्सग ओलाव्याला कोरडे करण्याकरिता सतत आपल्या पैरनीच्या पुढच्या भागाने नाकाला कुरवाळणारा, या कृतीने उभ्या देहाचा निम्मा भाग उघडा झाल्यावर उपस्थितांच्या हास्याचा विषय होणारा, यामुळे एकवेळ अनुयायांच्या मोठया हास्यकल्लोळ प्रसंगी आपण स्वत: बैठकीवरुनच चौकशी करुन मला जवळ बोलावून, कुंरवाळून ''धाकटया बाळा'' आई देत असलेले गृहपाठ पुरे करुन आश्रमातील अनुयायासारखे आसन घालून बसण्याच्या वयापर्यंत थांब व नंतर नियमीत ये. हा आश्रम तुला नक्कीच प्रवेश देईल असे सांगितले. तोच मी. तुम्ही संबोधलेले तेच ''धाकटा बाळ'' हे नांव

त्यावेळेपासून स्विकारुन आज या अनुयायी आश्रमात मनापासून अध्ययनाचे सातत्य ठेवले. आश्रमाच्या प्रथेप्रमाणे अध्ययन संपल्यावर दिलेल्या मोहीमेवर जाण्याबाबत माझ्या मंनात अनेक शंका आहेत. तुमच्या इथल्या वास्तव्यांत कोणीही अनुयायाने शंका विचारत्यावर त्याचा खुलासा करुन योग्य मार्गदर्शन करण्याची तुमची प्रथा मला चांगली आठवते. म्हणूनच ऐकेकाळी धाकटा बाळ म्हणून आपण नामकरण केलेल्या या बाळाच्या शंकाबाबत खुलासा करून मार्गदर्शन कराल या अपेक्षने पत्र लिहीत आहे.

ज्या मूळ शंकेबाबत मार्गदर्शन हवे आहे त्यापुर्वी त्याच अनुषंगाने एक शंका निर्माण झाली आहे. ती प्रथम मांडतो. साहेब, माझी शंका तशी कोड्यांत टाकणारी नाही. तरीही आपण याचा खुलासा काय कराल याबद्दल मनात कल्पना उभी राहते आणि तीच निर्माण झालेली शंका आहे. आपण कळवाल कि ''धाकट्या बाळा'' तुझ्या शंकेचा खुलासा करण्याकरीता आपल्या आश्रमातून आपला कर्तव्यभाग पार पाडण्याकरीता बाहेर पडलेल्या असंख्य परिपूर्ण अनुयायापैकी तुझ्या शंका कोणालाही विचारल्यास तुला योग्य मार्गदर्शन मिळेल. इतके दूर पत्र लिहून

तसदी का घेतोस ? याच निर्माण झालेल्या शंकेमुळे आपण वरील प्रमाणे मला सुचना केलीत तरी अमान्य करून तुमच्याच मार्गदर्शनाचा हट्ट धरायचा का ? हा कठीण व अवघड प्रश्न मला पडला. तथापि आपण अनुयायांना नेहमी सांगत असत की, या जगात अनेक समस्या कठीण व अवघड आहेत पण त्या सोडवणे अशक्य नाही. त्याची आठवण ठेवून मी ठरविलेला हट्ट धरावा हा माझा निर्णय आपण वरील प्रमाणे कळविण्यापूर्वीच सादर करतो. तुमची परवानगी मिळविणे हा माझा हट्ट आहे.

सद्दस्थितीत मला भेडसावणाऱ्या शंका व हवे असलेले तुमचे मार्गदर्शन मिळविण्याकरीता मला तुमची परवानगी हवी आहे. पत्र संपवताना एक गोष्ट स्पष्ट करतो की, इथे कार्य मोहिमेवर कार्यरत असलेल्या अनेक अनुयायापैकी निश्चित शंका निरसन होईल व योग्य मार्गदर्शन मिळेल असा आपल्या संस्कृतींतील प्रथा - रिवाजाप्रमाणे आपण आश्रम कुटुंबातील जेष्ठ अनुयायास वारसा हक्काने दिलेले कारभारी हक्क धारण करणारे, तुमच्या आश्रम स्थलांतरा नंतर इथला कारभार पहाणारे ''कारभारी'' सक्षम आहेत. त्यांना तुमच्या अनुपस्थित ''साहेब'' म्हणण्याची सांस्कृतीक प्रथेतूनच या देशाला सवय लागली आहे.

त्यामुळे आमच्या कारभाऱ्यांना इतरा प्रमाणे मी सुध्दा ''साहेब'' च म्हणून संबोधत असतो. मुद्दाम कळवावे वाटते की, तुमच्या इथल्या वास्तव्यात तुमच्या सहवासासाठी, मार्गदर्शनासाठी, मदतीसाठी जमणारी गर्दी या साहेबानांही सहन करावी लागते. तरीही ते नव्या उत्साहाने अशा गर्दीच्या समस्या जाणून घेण्यात व सोडवण्याच्या प्रयत्नात असतात. एक मात्र खरे कि, तुमच्या वास्तव्यात तुम्हाला भेटताना सामान्याला जे कष्ट व प्रतिक्षा करावी लागत असे तशीच स्थिती आमच्याही आज वाट्याला येत आहे. ''साहेब'' आपल्या कर्तव्यमोहीमेत इतके व्यस्त असतात की, कर्तव्यमोहीम पार पाडत असता, त्यांना मिळणाऱ्या आंनदापेक्षा मोहीमेतील अडथळे दूर करण्यांतच त्यांना फार कष्ट पडत आहेत. तुमच्या शिकवणूकीप्रमाणे ध्येयसाध्यतेसाठी अडथळयाची तमा न बाळगता कार्यरत रहावे याची आठवण ठेवून त्यांनी ही बाब आपणांस कळविली नसणार. परंतू मी आता ठरविलेच आहे की, अध्ययन पूर्ण करून गेलेले, अध्ययन चालू असता सांप्रत मोह पाहून अध्ययन निम्यात सोडून गेलेले तरीही आपल्याच आश्रमाचा वारसा सांगणारे अनुयायी आज प्रत्यक्ष भारतमातेसाठी काय करत आहेत? हे तुमच्या कानावर घालायचे. तरुणांनी शिक्षण

घेतल्यावर ते बंड करतील ही भिती बुध्दीवादांनी आपणाकडे व्यक्त केल्यावर तुम्हीच सांगीतले होते ना, ''की तरुण सुशिक्षीत झाला व त्याने बंड केले तरी ते देशाच्या प्रगतीसाठीच असेल. शिक्षण रोखणे म्हणजे देश प्रगतीला खीळ घालण्यासारखे होईल. ''थोरले साहेब'' तुमच्या कृपेने मी थोडासा शिकू शकलो. मग मीही तसा सुशिक्षीत नाही का? माझे थोडेसे बंडच समजा ना! बंड करुन तुमची परवानगी मीळवायचीच असा मी निर्धार केलेला आहे. निर्धार करणारी उद्याची पीढी निर्माण झाली पायवेलाय हे तुम्हीसुध्दा मान्य कराल असा विश्वास आहे.

केवळ एक शंकाखुलासा व मार्गदर्शन मागण्याकरिता आपलं लहानपण न विसरल्यामुळे मी पत्राद्वारे मागत असलेली परवानगी द्यावी ही पुर्णपणे नम्र परंतू पुर्णपणे आग्रही विनंती.

अभिवादन.

आपला आज्ञाधारक

**धाकटा बाळ**

# शुभेच्छा

मा. विलासराव पाटील

(वाठारकर)



# "थोरले साहेब
## पुण्यस्मृती अभिवादन"

बाळासाहेब संकपाळ

स्वातंत्र्य प्राप्तीच्या संधीकाळात जन्म लाभलेल्या पीढीने स्वातंत्र्य संग्रामातील स्वातंत्र्य सैनीकांचा त्याग व कष्ट ऐकले. म्हणूनच स्वातंत्रदिन, प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य सैनिकांचे स्मृतीदिन साजरे करताना सतत राष्ट्रप्रेमी संकल्पना करून अमलांत आणण्याचा निर्धार केला. राज्य व देश विकासांत आमच्या पीढीने पुढाकार घेवून राज्य व देश विकासांत सहभाग

घेतला. यामुळेच राज्यांत व देशात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विकासाचा सुवर्णकाळ अवतरला. तथापी या विकास व परिवर्तनाचा वाटचालीत देशप्रगतीला विघातक प्रवृत्तीच्या गृहणाचा स्पर्ष होवून आपण प्रजासत्ताक राज्यप्रध्दतीच्या स्विकार करून करत असलेल्या प्रगतीच्या वाटचालीत अडथळे येवू लागले. स्व. यशवंतरावजीना मार्गदर्शन मागणाऱ्या दि. २५-११-२०१० च्या पत्राला त्यांनी त्याच्या अनुयायास पाठवलेल्या पत्राद्वारे मार्गदर्शन करण्याची परवानगी देणारे पत्र सादर करत आहे.

यशवंतराव चव्हाण
'विरंगुळा,' इंद्रप्रस्थनगर,
कराड आळी, कृष्णाकाठ शेजारी,
जि.ध्रुवतारा, तारांगण महाराष्ट्र,
नभांगण भारत,
पिन : ०११९८५०२५०११०.
दिनांक : ५ डिसेंबर २०१०

प्रति,
चि. धाकटा बाळ
यांस अनेक आशीर्वाद

तुझे दिनांक २५ नोव्हेंबर २०१० चे पत्र मिळाले. मजकूर समजला. तुझ्या या पत्राला उत्तर द्यायचेच व यापुढे तुझ्या प्रत्येक पत्रातून व्यक्त होणाऱ्या शंका निरसन करण्याचा व यथाशक्ती मार्गदर्शनयुक्त सूचना करण्याचा मी जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे. तुझ्या पत्राला उत्तर लिहिण्याची सुरुवांत करण्यापुर्वी या पत्र प्रपंचाद्वारे गेल्या २५ वर्षापासून न मिळालेली संधी घेण्याचा मी विचार केला व तो फलद्रुप होत आहे या प्रसंगाने आज मी नेहमीपेक्षा आनंदात आहे.

धाकट्या बाळा, आज तारीख ५ डिसेंबर माझे पत्र तुझ्या हाती पडण्यांस आणखी किमान सांत दिवस लागतील. म्हणजेच दिनांक १२ डिसेंबरला हे पत्र तुझ्या हाती नक्की पडेल. तू सुध्दा माझ्या पत्राची वाटच पहात असणार याची मला खात्री आहे. पत्र हाती पडताच हा लिफाफा फोडून वाचण्यासाठी तू आतूर असणार याची सुध्दा खात्री आहे आणि मलाही तेच हवे आहे . या विचारांत असतानाच मी तुम्हा सर्वांच्या सानिध्यांत असताना आपण सर्वजण मिळून १२ डिसेंबर हा दिवस मोठया आनंदात व उत्साहात घालवताना आपल्या अनुयायी आश्रमाचे त्यावेळचे जेष्ठ अनुयायी व आजचे प्रमुख कारभारी यांचा जन्म दिवस थोरामोठ्यांच्या भरभरुन आशिर्वादाने व सर्व अनुयायांच्या शुभेच्छा सादरीकरणांतच जात होता. असेल तेथून व शक्यतो प्रत्यक्ष भेटून मी सुध्दा आशिर्वाद देण्यांस विसरत नव्हतो. नैसर्गीक स्थलांतरा नंतर आठवणी करण्यापलीकडे कोणीच काही करु शकत नाही. हा निसर्गाचा नियम अप्रीय असला तरी सर्वांना स्विकारावाच लागतो. पण आज मात्र तुझ्या पत्राला उत्तर देण्याचे कर्तव्य पार पाडताना आपल्या अनुयायी आत्रमातील कारभाऱ्यांस ''तुम्हा सर्वांच्या

साहेबास त्यांच्या कर्तव्य कार्यांत सामर्थ्य लाभावे हां आशिर्वाद कळवत आहे''आज १२ डिसेंबर असणार व म्हणूनच तूं तुझे ''साहेब'' जेथे असतील तेथे माझा आशिर्वाद पोहचता कर. तू तुझ्या सर्व सहकाऱ्यांच्या सामुहिक निर्धार बैठकितही तुझ्या साहेबांना त्यांच्या कामांत नेहमी साथ देण्याचा प्रस्ताव पारीत करुन घे. मी तर नेहमी प्रमाणे पुन्हा सांगतो की, यातच तुमचे, तुमच्या राज्याचे, तुमच्या देशाचे व नव्या पीढीचे कल्याण आहे. अर्थात हे मला ५० वर्षांपुर्वीच उमजले होते व म्हणूनच मी तुम्हा सर्वांना नेहमी तेच सांगत आलो. माझ्या पत्राचा पुढील भाग वाचण्यापूर्वी तू प्रथम मी कळवलेला आशिर्वाद पोहचता कर. मला माहित आहे तूला अडचण जाणवते ती तुझ्या साहेबापर्यंत पोहचण्याची. पण तुला आठवण करुन देतो की, पंढरपूरला जाणऱ्या वारकऱ्याला पांडूरंगाचे दर्शन घेताना वशीलेवाल्यास दडग्या दरवाजाने प्रवेश मिळत होता तरीही निश्चींम वारकरी भक्त हे वाळवंटापर्यंतच्या रांगेतून दिर्घ प्रतिक्षे नंतर पांडूरंगाचे दर्शन घेतल्यावर पांडूरंगाच्या दर्शनाने कृतकृत्य होत असत. तसाच तू वशीला न लावता ''कारभाऱ्या'' पर्यंत पोहचलास व माझा हा आशिर्वाद पोहचता

केलास तर तुला तोच आंनद होईल जो निस्सीम वारकरी भक्ताला होत असे.

तुझे पत्र वाचल्यावर माझी खात्री झाली होती की, तू शिस्तप्रीय व कर्तव्य पालनांत कटाक्ष पाळत असतोस. म्हणनूच माझा आशिर्वाद पोहचवण्याचे कर्तव्य तू पार पाडूनच माझे पत्र पुढे वाचण्यांस सुरुवांत केली असणार.

तुझे पत्र माझ्या हाती पडल्यावर इथल्या माझ्या अभ्यासिकेतील वातावरण व पार पडणाऱ्या घटनाक्रमाबद्दल तुझ्या मनांत आलेल्या कल्पनेबाबतची वस्तूस्थिती प्रथम तुला कळवण्याची इच्छा मी टाळू शकत नाही. कारण तू तशा पध्दतीनेच तुझी कल्पना सादर केलेली आहे.

विश्वविज्ञानाची गरुडझेप, विश्वशांतीची दिशा, समाजवादाची फलश्रुती, सर्वधर्मग्रंथाची शिकवण, कृषी - शिक्षण - सहकार व सांस्कृतिक मुल्ये, सामूहिक सहमतीचे फायदे या विषया वरिल प्रबंध, तसेच साहित्यांत नवनवीन भर पडलेले अनेक ग्रंथ इत्यादी विषयावरील विचारवंतांच्या, प्रतिभांवतांच्या अभिप्रयाच्या आजच्या टपालाच्या, टेबलावरील ढिगाऱ्यांतून

अस्तीवाने छोटयाशा असलेल्या व त्यामुळे मुख्य ढिगाऱ्यापासून टेबलाच्या कोपऱ्यावर हवेच्या धक्याने टेबलाखाली पडण्याच्या तयारीत असलेल्या लिफाफ्याकडे माझे लक्ष जाताच, या वयातला संपूर्ण उत्साह एकवटून केलेल्या चलाखीमुळेच तो लिफाफा टेबलावरुन खाली पडण्याऐवजी समोरच्या इतर ढिगाऱ्यांतील कोणत्याही विषयाच्या फायलीकडे लक्ष जाण्यापूर्वीच हातात आला. वास्तविक विस्कटणाऱ्या कागदपत्राला सावरण्यापुर्तीच प्रस्तुत कृती मर्यादीत होती, तथापी हा छोटासा लिफाफा कोणी पाठविला व कशासाठी असावा या कुतूहलाने पाहू लागलो.

बाळा, तुझ्या पत्रांत सुरुवातीलाच नमुद केलेल्या, पत्र लिहीताना तुला वाटणाऱ्या भावना व आज तुझे पत्र हाती घेवून वाचायला सुरुवांत करेपर्यंतची तुला भावलेली कल्पना तंतोतंत बरोबर आहे. तुझ्या अपेक्षे प्रमाणे तुझ्या पत्रानंतरच्या माझ्या लगेचच्या या पत्रांत मी प्रांजळपणे कबूल करुन तुझी भविष्यवाणी खरी झाल्याचा तुझा आनंद मी इतक्या लांबूनही अनुभवण्याची संधी घेतो.

वास्तविक माझ्या आजच्या वास्तव्याबाबत मी माझा ठाव

ठिकाणा ज्यांच्याशी साधणे गरजेचे आहे व ज्यांनी आपले काम उरकून आमच्या इथल्या आश्रमांत ''कर्तव्य-मुल्यांकन, समीक्षा व मोजमाप-ताळेबंद ''वर्गात दाखल होवूं इच्छीणाऱ्या गरजवंतानाच कळवण्याचा कटाक्ष पाळला आहे. तथापी येणाऱ्या टपालातून इतका लहान लिफाफा व ''बरोबर'' पत्ता पाहून पाठवणाऱ्या प्रेषकाबद्दल कुतुहल निर्माण होणे स्वाभाविक होते. झालेही तसेच. धाकटया बाळा, तुझे नावं व पत्ता वाचल्यावर प्रथम आंनद कशाचा वाटला असेल तर हा आपला अनुयायी आश्रम आजही कार्यरत आहे याचा. आपला अनुयायी आश्रम कार्यक्षम सातत्य राखून कार्यरत राहील याची तजविज करण्यांत तीथल्या वास्तव्यांत कटाक्षाने लक्ष देत होतो. इकडच्या मुक्कामात इथल्या प्रथा व कटाक्ष पाळतांना दिलेल्या जबाबदारी व्यतिरिक्त कशांत सहभाग घेण्याचा प्रश्न येत नाही. तथापी प्रत्येकाच्या आवडी-निवडी पहाता येथील अनेक विषयावरील परिसवांद, सांस्कृतीक कार्यक्रम इत्यादीचा आनंद लुटण्याची येथे व्यवस्था उत्तम आहे. इथल्या विचारवंताकडून, प्रतिभावंताकडून आपल्या प्रबंधावर आपसांत चर्चा करण्याची प्रथा असून गरज पडल्यांस एकमेकाचे अभिप्राय

मागण्याची पध्दत आहे. यामुळे निर्माणकर्त्याला अमूल्य मार्गदर्शन लाभते असा येथील सिध्दान्त आहे. त्यामुळे रोज टेबलावर असा ढीग असतो. नवीन-नवीन परिवर्तन व दिशा वाचन करण्याची सवंय अखंडपणे जोपासता आली असली तरी लिखाण करण्यांत खंडच पडला आहे. येथे जमणाऱ्या सर्वच जणांच्या बाबतीत पुर्णत्वाची मर्यादा ओलांडलेले सर्वजण असल्याने त्यांना काही वाचनाकरिता लिहीले तर ते त्यांना त्याआधीच माहीत असल्याचे दिसते.

आपण निश्चीत केलेल्या देशप्रगतीच्या आराखडयाबाबत तुझ्या सारखा किमान एक तरी धाकटा बाळ जागृत आहे हे समजून समाधान वाटले. तुझ्याशी संपर्कासाठी इथल्या प्रथेप्रमाणे असलेले सर्व सोपस्कर पूर्ण करण्याच्या प्रक्रिया पत्र वाचून झाल्या झाल्या पुर्ण करण्याच्या सुचना दिल्या आहेत. माझी परवानगी घेवून मला शंका विचारणारे व अभिप्राय आणि मार्गदर्शन मागणारे, तीथल्या वास्तव्यातही अनेकजण आठवतात. इथे असा प्रश्नच उदभवत नाही. त्यामुळे तू ज्याला हट्ट समजलेस तो हट्ट नसून तुमच्या तिथल्या मातीने तीथल्या लोकांवर केलेल्या संस्कारातील

उत्तोमोत्तम लाभस्थानापर्यंत जाण्याचा उत्तम व अंतीम मार्ग आहे. म्हणून तो तुझा हट्ट नसून हक्क आहे हे स्पष्ट होते. तरीही तुझ्या सुसंस्कृत सादरीकरणातला हट्ट स्विकारुन तूला पत्राने शंका व्यक्त करण्यांस परवानगी देण्याचा औपचारीक सोपस्कर पूर्ण झाला आहे. असे कळवताना मला तुझा अभिमान वाटतो.

आपल्या आश्रमातील नेहमीचे अध्यपनवर्ग "कारभाऱ्यांच्या" देखरेखेखाली कार्यरत ठेवण्याची माझी अपेक्षा सर्वांना कळवण्याकरिता सांगत आहे. अनुयायी अध्ययनांत व्यत्यय निर्माण होवून अनुयायांचे लक्ष विचलीत होणार नाही याची दक्षता घेत आश्रमाच्या मधल्या प्रांगणांत तुळशी वृंदावनासमोर प्रार्थनावर्गाची सुरुवांत होण्यापूर्वी देण्यांत येणाऱ्या सुचना काळांतच माझी वरील अपेक्षा सर्वांच्या कानावर घाल. इतक्या लांबून आवर्जून तू माझी आठवण केलीस व हट्ट धरून शंका समाधान मागण्याची इच्छा प्रगट केलीस यावरुन आपल्या परिसरांत संस्कृतीची मुल्ये जपण्याची परंपरा अखंडपणे कार्यरत असल्याबद्दल समाधान वाटले.

इथल्या नियमाप्रमाणे सिमेपार पत्रव्यवहारासाठी इथल्या

शासनाची परवानगी लागते. याकरिता तुझ्याशी पत्रव्यवहार करण्यकरिता मी रितसर परवानगी मागीतली व परवानगरीसाठी योग्य समर्थन केल्यामुळे तशी परवानगी मी घेत आहे. त्यामुळे तुझी शंका कळवल्यांस मी मार्गदर्शनवजा सुचना करीनच. तथापी तुझ्या शंकेतील संबंधीतांकडून अपेक्षा व्यक्त करणे इतकेच होईल. आता आदेश देण्याच्या मर्यादेपलीकडे आपले विश्व वेगळे असल्याने हा संकेत पाळणे आपले कर्तव्यच असेल. याबद्दल तू जागृत रहावे ही अपेक्षा

यशोमंदीराकडे जाताना प्रेरणा व सामर्थ्यासाठी येथील कृष्णा काठच्या असंख्य अमृत शुभेच्छा.

**तुम्हा सर्वांचा**
**यशवंतराव चव्हाण**



# "थोरले साहेब पुण्यस्मृती अभिवादन"

बाळासाहेब संकपाळ

स्व. यशवंतरावजीनी अनुयायी आश्रमातील अनुयायास शंका समस्या कळवण्याची परवानगी दि. ५ डीसेंबर २०१० च्या पत्राद्वारे दिली आहे. त्यानुसार हा अनुयायी स्व. यशवंतराजीनी येथील वास्तव्यांत दिलेल्या शिकवणूकीतून महाराष्ट्राला, देशाला विकास परिवर्तनांत लाभलेल्या यशाची परंपरा खंडीत होत असल्याबद्दल खंत व्यक्त करून अधोगतीकडून प्रगतीकडे

वळण्याकरीता मार्गदर्शन मागत आहे. देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात अनेक पीढींनी आपली आहुती देऊन या संग्रामात योगदान देणाऱ्या पीढीतील स्व. यशवंतरावजींच्या व अनेक राष्ट्रवादी विचारसरणीच्या साक्षीने स्वातंत्र्य मिळाले. या स्वातंत्र्य मिळालेल्या २० व्या शतकात आपण अनेक क्षेत्रात नेत्रदिपक यशही मिळविले. तथापी २१ व्या शतकात जाण्याच्या तयारीत असतांना या सर्व यशाच्या शिखरांचा विध्वंस का करीत आहोत ? आज आपल्या पुढील ही अक्रमाची समस्या आहे. स्व.यशवंतरावजींच्या मार्गदर्शनानूसार नव महाराष्ट्र निर्माण होण्यांत व देशाला एक समर्थ आदर्श राज्य देण्यांत कोणतीही अडचण नसताना आम्हीच आमच्या विशिष्ट वाटचालीचा मार्ग हरवलो आहोत का ? आम्हाला संस्कृतिने दिलेले संस्कार, आमची मानवतावादी ऐतिहासिक परंपरा, सामाजीक नितीमत्ता, समता, ध्येयवाद, ऐक्य भावना इत्यादी मुल्ये आम्ही जतन करणार आहोत की नाही ? स्व. यशवंतरावजींच्या आदर्शांचे अध्ययन केलेल्या अनेक अनुयायांप्रमाणे आजच्या पीढीपुढे हा प्रश्न आहे. ''थारेल साहेब - पुण्य स्मृती अभिवादन'' या लेखमालेतील दुसरे पत्र आज सादर करत आहे.

धाकटा बाळ

अनुयायी आश्रम, विरंगुळा परिसर,

कृष्णा काठ, कराड, जि. सातारा,

महाराष्ट्र, भारत.पि.-०२५०११०१९८५०

दिनांक : ०१/०१/२०११

प्रति,

वंदनीय सर्वपीतृ प्रमुख 'साहेब'

''विरंगुळा'' इंद्रप्रस्थनगर,

कराड आळी, कृष्णाकाठ शेजारी,

जि.ध्रुवतारा, तारांगण महाराष्ट्र,

नभांगण भारत, पिन कोड नं. ०१९८५०२५०११.

आपले ५ डिसेंबरचे पत्र मिळाले. अपेक्षे प्रमाणे आपण मला पत्राद्वारे शंकासमस्या कळवून आपले मार्गदर्शन मिळवण्याबाबत परवानगी दिलीत याबद्दल आनंद वाटला. आपण कळवल्या प्रमाणे तुमचे पत्र मला १२ डिसेंबरलाच हाती पडले. आपल्या येथील वास्तव्यांत आपण कामाच्या नियोजनांस प्रथम प्राधान्य देत असत. तीच शिस्त आजही निवृत्तीकाळांत आपण पाळत आहांत हे आम्हाला प्रेरणा देणारे वास्तव आम्ही स्विकारतो.

आपले पत्र हाती मिळताच उत्सुकतेने वाचण्यांत सुरवात केली आणि आपण पत्राच्या सुरूवातीलाच माझ्यावर सोपवलेली कामगीरी पार पाडली. अनुयायी आश्रमांत १२ डीसेंबरला पंढरपुरच्या आषाढी एकादशीच्या गर्दीसारखीच गर्दी होती. साहेबांच्या वाढदिवसानिमीत्त येथे शुभेच्छा देवून संकल्प करण्याचा कार्यक्रम ठरलेलाच असतो. अनुयायी आश्रमाच्यावतीने साहेबांना शुभेच्छा देण्याचा क्रमही पहिलाच असतो. आमच्यातील ज्येष्ठ अनुयायाला ही कामगीरी पार पाडण्याची जबाबदारी दिली जात असते. आपल्या शुभेच्छा प्राधान्याने प्रथम पोहचत्या करण्याचा माझा प्रस्ताव सर्वानीच मान्य केला व विशेष आनंदाची बाब म्हणजे ही कामगीरीही सर्वांनी मोठ्या आनंदाने माझ्यावर सोपवली. अनुयायी आश्रमातील साहेबांना शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम साहेबांच्या उपस्थितीच करण्याचा आमचा निर्णय होता. तथापि राज्यातील दुष्काळ परिस्थितीच्या निवारण कार्यात सर्व अनुयायी गुंतले असल्याने आजचा वाढदिवस अनुयायांच्या, हितचिंतकांच्या सहवासात घालविण्या ऐवजी, साहेबांनी अनुयायी आश्रमाच्या महत्वाच्या

शाखेवरच वेळ घालविण्याचे ठरविल्याचे आम्हांस सांगण्यात आले. आमच्या अनुयायी आश्रमातील साहेबांना शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम सुरु होत असतांना या परिसरांत संगीत स्वरांच्या प्रसन्न वातावरणाने आसमंत व्यापून टाकला होता. व्यासपीठावरील औपचारीकता पुर्ण होताच अनुयायी आश्रमाच्यावतीने शुभेच्छा देण्याकरीता आमच्या प्रतिनिधीस पाचारण करण्यांत आले. शुभेच्छा देण्याची कामगीरी माझ्यावर सोपवलेली असल्याने मला ही संधी मिळाली. मी प्रत्यक्ष व्यासपीठावर पोहचलो तरीही घोषीत कामासाठी अद्याप कोणी दुसराच येणार असल्याच्या भावनेने सागळयांच्या नजरा फीरत होत्या. कारण व्यासपीठावर वावरणारा मी तसा नवखाच होतो. व्यासपीठावर पोहचताच मी प्रथम आपण दिलेल्या शुभेच्छा जाहीर केल्या. आपण पाठविलेल्या शुभेच्छा मी येथे जाहिर केल्या असल्या तरी आज साहेब ज्या महत्वाच्या शाखेवर आहेत तेथे साहेबांशी थेट संपर्कात येणाऱ्या आमच्या वरिष्ठ अनुयायांकडे याच शुभेच्छा सुपूर्द करुन पोहचत्या करण्याची जबाबदारी दिली. आमचा येथील कार्यक्रम चालू असतानाच या शुभेच्छा साहेबांना पोहचत्या झाल्याचे मला

सांगण्यात आले व मी कर्तव्य मुक्त झाल्याचे समाधान वाटले. अनुयायी आश्रमाच्या वतीने मी साहेबांना शुभेच्छा दिल्याच पण त्यापुर्वी तुमच्या शुभेच्छा जाहिर करताना तुमच्या पत्राची सर्वांना माहिती दिली. त्या दिवशी आमच्या संपूर्ण परिसरांत व अनुयायी कुटूंबात आपण पाठवलेल्या शुभेच्छाचीच चर्चा होती. संपूर्ण परिसर तुमच्या इथल्या वास्तव्याच्या आठवणीत रमून गेला होता. तो दिवस आम्हा सर्वांनाच उत्साही व नव्या प्रेरणेचा जाणवला. शुभेच्छा स्विकांरतांना साहेबानी कृतज्ञतापुर्वक आपणांस विनंम्र अभिवादन करुन नव्याने कार्यपुर्तीचा संकल्प केला असल्याचे मला सांगण्यांत आले.

येथील सद्यसामाजीक परिस्थितीचा विचार करता माझा पत्र प्रपंच लांबत रहाणार आहे. या माध्यमातून माझ्या शंका व अपेक्षा स्वैरपणे लिहीण्याची-मांडण्याची मी संधी घेणार आहे. आपणही आपल्या पत्रातून आपले मार्गदर्शन खुलासेवार कळविण्याची प्रचिती द्याल ही अपेक्षा. अस्तीत्वात असलेल्या महाराष्ट्राचे भावनात्मक ऐक्य, आर्थीक विकास यावर महाराष्टाचे भवितव्य अवलंबून असल्याचे आपण आम्हाला सांगीतले होते.

महाराष्ट्रातील विशिष्ट परिस्थिती, महत्वाच्या समस्या मांडून आर्थिक, शैक्षणीक व सांस्कृतीक विकासाच्या दिशा इत्यादी बाबत प्रगतीचे टप्पे आपण सांगीतलेत. याच बाबत उत्तम प्रशिक्षाणार्थीची फौज निर्माण करण्याकरिता आपण अध्ययनाची सोय सर्वपातळीवर करुन त्या त्या ठिकाणी निर्णय घेण्याचे व आपला विकास करण्याचे अधिकार स्थानिक पातळीवर देऊन समाज सेवकांची फौज निर्माण केलीत. नवमहाराष्ट्राच्या निर्मीतीकरिता आपल्या मार्गदर्शनातून झालेल्या विकास कार्याचे सातत्य राखण्याकरिता आपल्या अनुयायी आश्रमात झालेले संशोधन कार्यरत ठेवण्याच्या कार्यक्रमाला प्राध्यान्य द्यावयाचे आहे. या करीता सामाजातील कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अमंलबजावणीतून परिपूर्णता पडताळण्याची व गरजेच्या ठिकाणी दुरुस्ती सुचवण्याची कामगीरी पार पाडावयाची आहे. या कामगीरीवर अनुयायी आश्रमातून बाहेर पाडल्यावर प्रथम स्वैर परंतू मुक पहाणीत हे काम करण्याकरिता समाजातून अपेक्षीत सहाकार्याबद्दल मला बरीच विसंगती आढळल्याने माझे मन बैचेन झाले.वास्तविक आमचे महाराष्ट्र राज्य देशांत सर्व क्षेत्रांत



G01495
24·01·11

अग्रगण्य राज्य म्हणून गणले गेले होते. तथापि माझ्या मुक पाहणीत राजकीय व प्रशासकीय स्थरावर अपप्रवृत्तीचा प्रभाव वाढून वितंडवाद, भष्ट्राचार, विध्वंस, दहशतवाद, जाती जातीतील तेढ आणि स्वार्थी प्रवत्ती यामुळे लोकशाहीचे नांव घेत महाराष्ट्राचा समाजपुरूष वैफल्यग्रस्त अवस्थेत पहावयांस मिळत आहे. साहेब, महाराष्ट्राची ही अवस्था सांगताना आमच्या देशाचीही स्थिती वेगळी नाही हे सुध्दा जाणवते. तुम्हा मंडळीनी गुलामगीरीचे हाल आणि स्वातंत्र्यांचे मोल समाजाला पटवून दिलेत व एकसंघतेने स्वातंत्र संग्रामाला कार्यक्रम दिलांत.अनेकांच्या त्यागातून, आहूतीतून स्वातंत्र मिळवलेत. २० व्या शतकातील स्वातंत्र प्राप्ती नंतरचा काळ आमच्या पीढीला प्रेरणादायी ठरला. आपण आपल्या सहकार्याच्या मदतीने नियोजन केलेल्या कार्यक्रमाचे सातत्य राखून आम्हाला पदोपदी नव्या वाटा व नव्या दिशा दाखवून उद्याचा महाराष्ट्र व उद्याचा भारत यात आमची भूमिका सांगीतलीत. तीच भूमीका घेवून तुमच्या काळात तुम्हाला मिळत असलेले समाजातील सहकार्य व आज आम्हाला हवे असलेले सहकार्य यात खूपच विसंगती वाटते. साहेब, तुमच्या पीढीने २० व्या शतकात

आम्हाला प्रगतीशील परिवर्तन कसे करायचे याचा प्रत्यय दिला म्हणूनच २० व्या शतकाची आठवण होते.

२० व्या शतकांत लोकमान्य टिळकांपासून म. गांधी पर्यंत आणि सुभाषचंद्र बोसपासूयन प. नेहरु पर्यंत उतूंग व्यक्तीमहत्वाची मालीकांच दिपमाळे प्रमाणे प्रज्वलीत झाल्याचे आम्ही पाहीले. या शतकांत महायुद्धे झाली व देश पुन्हा उभे राहिले. या शतकांत अणूबांबने बेचिराख झालेले हिरोशिमा फिनिक्स पक्षाप्रमाणे पुन्हा प्रगतीच्या प्रांगणांत झेपावले. यां शतकांत अणू उर्जा अवतरली.यां शतकांत बर्लीनची भींत पाडून बर्लीनचे तुकडे जोडले गेले व बलाढ्या रशियाचे तुकडे झाले. या शतकांत आपल्याला स्वातंत्र मिळाले. या शतकांत भारताच्या विशाल लोकशाहीचा पाया घातला गेला. आपण स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सवही याच शतकांत साजरा केला. विज्ञानाचा विकास झाला व आपण आकांशात झेप याच शतकांत घेतली. खगोल शास्त्रतले बारकावे समजण्यासाठी जंतरमंतरच्या जागी नेहरू तारांगण याच शतकांत उभे राहीले. याच शतकांत सारं जग इंटरनेटच्या रुपाने आपल्या वीतभर मुठीत आले. मानवाच्य सुखी समृद्ध जिवनाचा ठेवा समाजाला दाखवणारे

सुसंस्कृत समाजसुधारकही याच शतंकांत पाहिले. साहिष्णूता ही भारताची प्राचिन संस्कृती सांभाळणारे आम्ही जो-जे बांछील ते-तो लाहो ही प्रार्थना याही शतकांत अखंड ठेवली. देशाच्या अस्मीतेचा विचार स्वराज्यांत परिवर्तीत होतो हे याच शतकांत अनुभवले. प्रादेशीक अस्मीतेची ऐतिहासीक एकजूट संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून याच शतकांत अनुभवली.

अशा या वैशिष्ट्याने परिपुर्ण असलेले २० वे शतक संपवून वैज्ञानीक विकासासह आम्ही २१ व्या शतकांत प्रवेश करुन पुढेचे एक-एक दशक संपवायला सुरवात केली आहे. २१ व्या शतकांत प्रवेश करण्यापुर्वीचे दशक आम्ही नव्या शतकांत काय घेवून जाणार आहोत याचा निश्चित आराखडा पुसट करण्यांत व्यर्थ शक्तीपात केल्याचे जाणवू लागले आहे. यामुळेच २० व्या शतकाची आठवण करत असताना आज अनुभवत असलेले वास्तव आपणापुढे मांडत आहे.

२० व्या शतकांत आम्ही जे-जे जोपासले ते-ते आता तासातसाला अज्ञात शक्ती उध्वस्त करत आहेत.

देशाच्या प्रारगणांत काढलेली संस्काराची प्रदिर्घ रांगोळी

कोणी तरी विस्कटत आहे. जिवनाच्या प्रवासासाठी अचूक सुखकर महामार्ग तयार करुन ठेवले असले तरी आज जपून पावलं टाकण्यासाठी पायवाट देखील दिसत नाही. ज्यांच्याकडे मान उंचावून पहावं अशी हिमालयाच्या उंचीची व्यक्तीमहत्व असलेली माणसं दिसत नाहीत. आणि वाकून ज्यांच्या पायाला स्पर्ष करावा असे सतपुरुषही उरले नाहीत. ज्यांची आराधना केली त्यांची संभावना होत आहे. ज्यांच्या गुणांशी आम्ही नतमस्तक झालो त्यांच्याशी आज प्रतारणा होत आहे. मूल्यांकीत आचरण शुन्यांकीत झाले आहे. जिवनमुल्यांचा अर्थच बदलल्याने आदर्श होत त्यांच निर्माल्य झाले आहे. माणसातली माणूसकी वितळली आणि त्यांची यंत्र झाली आहेत. जंगलातील पशु देखील सुखासमाधाने जगत आहेत. सिंह, वाघ अशा सारख्या हिंस्त्र पशूनी सिंह सिंहावर आणि वाघ वाघांवर जीवघेणा हल्ला करत असल्याचे ऐकीवात नाही. समूहाने निसर्गधर्म पाळतच आपले जिवन आपल्या मर्यादेतच घालवत असतात. पण या सुधारलेल्या २१ व्या शतकांतील माणूस मात्र माणसाला जगू देत नाही. आज माणूसच माणसाला मारतो आहे व माणूसच माणसाचे तुकडे करत आहे. जो

येतो तो खणताना दिसतो-उकरताना दिसतो. जो येतो तो काही तरी मागतो, हात पसरतो. घेणाऱ्यांचे हात उदंड झाले आहेत आणि या गर्दीत देणाऱ्याचा हात मात्र दिसतही नाही व सापडतही नाही.माणसाने माणसासाठी निर्माण केलेल्या वास्तूसह एकमेकांना उद्ध्वस्त करणाऱ्या या जगात उद्या मानव जातीचे काय होईल याची चिंता करायला कोणी राहिल्याचे दिसत नाही. आता आम्ही वारंवार स्वत:चा विचार करतो तर कधी-कधी देशाचा विचार करतो. घरातले-मनातले देव्हारे उतरले गेलेत व शेजारधर्म फ्रीजमध्ये फ्रीज झाला आहे. नाक्या नाक्या वरची श्रद्धास्थाने जीर्ण होवून बार मुजरा याचा सुकाळ झाला आहे. मुलाला मॉडेल व्हायचं आहे तर मुलीला सौदर्यस्पर्धेत भाग घ्यायचा आहे. देशातून गेलेले ब्रीटीश रुप पालटून घरां घरांत शिरले आहेत. आता वरण भाताची चव कळत नाही. देश हा देश राहीला नाही व वेश हा वेश राहीला नाही. आई वडीलांचा मान राहीला नाही व कुटूंबाची शान राहीली नाही. प्रत्येकाला कसंही करुन काहीही करुन कोणाचाही कसलाही पैसा हवा आहे. आणि पैशाशिवाय प्रतिष्ठा वाटत नाही. तुम्ही जोपासलेला राष्ट्रवाद आणि सांस्कृतिक परंपरा टिकविण्याचा

एकीकडे प्रयत्न होत असता दुसरीकडे अशा दुष्प्रवृत्ती वाढत आहेत. आपण दिलेले संस्कार आम्ही पाळत आलो. म्हणूनच परंपरेचे व संस्काराचे मोल आम्हास कळू शकले.हीच परंपरा पुढच्या पीढीला आत्मसात करण्याकरीताचे महत्वाचे काम कसे पार पाडायचे याच संभ्रमात आजची कार्यरत पीढी सापडली आहे.

याचाच परिणाम आम्ही वारंवार सगळीकडे घोटाळे ऐकत आहोत, चारा घोटाळा, डाळ घोटाळा, संरक्षण शस्त्र खरेदीत घोटाळा, पतसंस्थेत घोटाळा, हवाला घोटाळा, टेलीफोन घोटाळा, एस.टी.त घोटाळा, ७/१२ त घोटाळा, दुध संघात घोटाळा, वीज मंडळात घोटाळा, जातीच्या सर्टीफिकेटमध्ये घोटाळा, शाळेच्या सर्टीफिकेटमध्ये घोटाळा, सवलतीचा पास देताना घोटाळा, सरकारी स्टॅम्प छापताना घोटाळा, नोटा छापताना घोटाळा, मुलाखतीतील उमेदवाराला पास करताना घोटाळा, सरकार देणाऱ्या सरकार पाडणाऱ्या आमदारांत, खासदारांत घोटाळा, साखरेत घोटाळा, गरीबाला मिळणाऱ्या अनुदानांत घोटाळा, विद्यार्थ्यांना द्यायच्या खाऊत घोटाळा, विकायला मांडलेल्या वस्तूत घोटाळा, परिक्षेत राज्यात पहिला येणाऱ्या विद्यार्थ्याला

नापास करता येते व पास होणाऱ्या अनेकांना नापासाच्या यादीत ठेवता येते. पैसा नसतानाही योजना आखल्या जावू शकतात सरकारी अनुदान न देताच बजेट संपते. गंगेचा प्रवाह नसला तरी विकासगंगा दारांत आणण्याच्या आश्र्वासनाची खैरात होते. दुसऱ्याची चूक दाखवणारा तुरुंगात जातो. लूटमार होते. खूनखराबी होते. बॉम्बेस्फोट होतात. लोकशाहीचे पवीत्र मंदिर असलेले लोकसभागृह उडवण्याचा प्रयत्न होतो. तहलकाद्वारे अप्रीय घटना लाखोंच्या नजरेसमोर येवूनही आपण काहीच चूकत नसल्याचा भास यशस्वी केला जातो. जाती-जातीत -धर्माधर्मात तेढ वाढवून हत्या जाळपोळ होतात.याबाबींना खंड नाही व उद्याकरिता दिलासा नाही.

या सर्व पार्श्वभूमीवर अद्रश्य टोळीकडून आपल्या स्थलांतरानंतर १५ वर्षात म्हणजे २००० साला पर्यंतच्या काळांत देशात दहशतवादाने ६१०१३ जणांचे बळी घेतले. किमान सहा लाख लोकांना बेघर व्हावे लागले. सिमापार दहशतवाद रोखण्यासाठी ४५ हजार कोटी रूपये देशाला किंमत मोजावी लागली. सुरक्षा दलाने ४८ हजार टन धोकादायक

स्फोटक जप्त केली. ६१ हजार लोक व ६ हजार पोलीस दहशतवादाचे बळी पडले. पार्लमेंट हाऊसवर, राज्यांच्या विधानभवनावर, धार्मीक स्थळावर विध्वंसक हल्ले, लोकप्रतिनिधींच्या हत्तेचे कट अशा अप्रीय बाबी अनुभव्या लागल्या. हे सर्व रोखण्यासाठी १९८५ साली टाडा कायदा दोन वर्षासाठी अंमलात आला. पुढे १० वर्षासाठी वाढवला. टाडा कायद्यांतर्गत ७६ हजार जणांना स्थानबध्द करण्यात आले. त्यातील २५ टक्के लोकावर आरोपपत्र दाखल केले नाही. ३५ टक्के जणावर खटले चालवले. त्यातील ९५ टक्के लोक पुराव्या अभावी निर्दोष सुटले. शिक्षेचे प्रमाण दीड टक्का असताना ७५ हजार निराराधांना टाडाखाली तुरूंगात डांबण्यात आले होते. या सगळ्यांतून आम्ही मिळवले काय याचा कोणाकडे हिशोब आहे?

ज्यावेळी पहिला दगड फेकला जातो, पहिला घाव घातला जातो तेव्हा ठिणगी पडते. त्यानंतर या कृत्याचे कर्ते हात घरी जातात. असे कोणीही असो. आपल्यामागे संकटाचे मलबे ठेवून जातात. याचा कोणाहीकडे भान नसतो.

आमच्या परिसरांत एका आघाडीच्या वृत्तपत्रांत गेल्या

सप्टेंबर महिन्यात १५ तारखेच्या अंकातील संपादकीय अग्रलेखांत सद्यस्थितीत देशातील भ्रष्ट व अर्धभ्रष्ट नागरिकांची टक्केवारी ८० प्रतिशत असल्याचा देशाच्या दक्षता आयोगाच्या सुत्राकडूनच जाहीर निरिक्षण नोंदवले गेले असून राहिलेले २० टक्के लोक आपले चारित्र्य कसेबसे टिकवून असल्याचे म्हटले आहे. हे वास्तव प्रत्येकाने स्वत:ला आरशांत पहाता दिसेल असे सुचित केले आहे. दुसऱ्याच दिवशी याच वृत्तपत्रांत संपादकीय अग्रलेखात ४० वर्षापूर्वी भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटण करण्याचे आवाहन करून सुरू झालेल्या आंदोलनापासून आजपर्यंत राबवलेल्या आर्थीक धोरणातूनही त्यांचे उच्चाटण नाहीच. तथापी महासत्ता व स्वावलंबी होण्याचे स्वप्न पहाताना आज जगांत भारताबद्दल जितके कुतूहुल व आकर्षण आहे, तीतकीच नाचक्कीही होत आहे. हे चित्र भविष्यातील प्रगल्भ महासत्तेचे नाही तर ऱ्हासग्रस्त देशाचे आणि बिभस्त सांस्कृतीकतेचे आहे. या दोन्ही दिवसाचे अग्रलेखातील विवेचन वाचून मन खिन्न असतानाच त्याच महिन्यात शेवटच्या आठवड्यांत शेजारील देशांतही हीच अवस्था असल्याचा तपशील वाचायला मिळाला.

सुवर्ण काळ खंडीत झाला तरी परिवर्तीत समाजव्यवस्थेत आजही आम्ही उंच उंच गगनचुंबी इमारती बांधतो आहोत पण आमच्या वृत्ती संकुचीत बनत चालल्या आहेत. आम्ही रस्ते रुंद करु लागतो पण दृष्टीकोन अरुंद होत चालला आहे. आम्ही खूप खर्च करत असतो पण समाधान मिळवत नाही. आमच्या कुटूंबाना मोठमोठी घरे किंवा बंगले मिळतात पण स्वतंत्र राहण्याच्या हव्यासापोटी कुटूंबे छोटी होवू लागलीत. आम्ही घरांत आपल्यासाठी खूप सोयी-सुविधा करुन घेतो पण त्याचा उपभोग घेण्यासाठी आमच्याकडे वेळ नसतो. आमच्यात खूप पदव्या मिळवल्या जातात पण शहाणपण कमी येते. आमच्यांत ज्ञान असले तरी आजुबाजूच्या परिस्थितीचे भान रहात नाही व अंदाज येत नाही. आमच्या कारखान्यांत तज्ञ खूप असतात पण प्रामाणिकपणा क्वचितच आढळतो. आम्ही खूप औषध घेतो, उपचार करतो पण तंदुरुस्त व सध्दृढ नसतो. रात्री उशीरा पर्यंत जागतो पण वाचन क्वचितच करतो. मनोरंजनात खूप वेळ घालवतो परंतू मैदानांत खेळायला वेळ मिळत नाही. खूप गप्पागोष्टी करतो पण त्यांत जिव्हाळा नसतो, आम्ही चरितार्थ

शिकलो आहोत पण जिवन जगायला शिकत नाही. आमच्या मालमत्तेत भर पडत जाते पण जिवनमुल्ये दिवसेंदिवस कमी होत चालली आहेत. आम्ही अंतराळात जावू शकलो तथापी नव्या शेजाऱ्याला भेटण्याचा त्रास आम्ही घेत नाही. बाहेरचे अवकाश आम्ही जिंकलो आहोत पण अंतरंगातील अवकाशावर स्वार होवू शकलो नाही, आम्ही संरव्यात्मक प्रगती केली आहे. पण गुणात्मक नाही. हवा, पाणी, शुध्दीकरणाची आम्ही वैज्ञानिक प्रगती करु शकलो पण आपल्या आत्म्याच्या शुध्दीकरणाची आम्हाला गरज वाटेनाशी झाली आहे. आम्ही खूप वाचन करतो पण अजिबात बोध घेत नाही. आम्ही धावपळीचे जिवन जगत आहोत पण क्षणभर विसावत नाही. आम्हाला नातलग खूप आहेत पण नाते जुळणारे नाहीत. एकूणच समाज मनाची सामाजिक मन:स्थिती या अवस्थेत परिवर्तीत झाली आहे.

अशा सामाजीक अवस्थेत आमच्या अनुयायी आश्रमातील सामाजीक विषयांच्या संशोधनातील अनेक विषयांचे निष्कर्ष राबवण्याकरिता आमचे साहेब कार्यरत आहेत. वास्तवाचा स्विकार करून दुरूस्ती करण्याचे उपाय राबवण्याचा कार्यक्रमांत ते नेतृत्व करत आहेत. तथापी तुमच्या काळांत नेतृत्वाला

मिळणारी एकसंघतेची साथ आज त्यांना मिळण्यास कठीण जात आहे. तरीही खचनू न जाता कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी ते अविरत कार्यरत आहेत. त्यांना आता सर्वांची साथ हवी आहे. साहेबांना साथ देण्याकरिता अनुयायी आश्रमातील अनेक जेष्ठ अनुयायी यापुर्वीच आश्रमातून बाहेर पडले असले तरी काहीजण व्यक्तीगत मोह पाशामुळे या कार्यक्रमापासून वेगळे झाल्याचे पहावयांस मिळत आहे.

आपल्या अनुयायी आश्रमातील अनुयायांचे अध्ययन पुर्वी प्रमाणेच प्रभावीपणे कार्यरत राहण्यासाठी साहेबांचे अखंड लक्ष असतेच. आपल्या स्थलांतरा नंतर केवळ राज्यातील व देशातील समाजीक गरज म्हणून साहेबानी आपणासह अनेकांना फारकत घेण्यांस भाग पाडलेल्या मूळ मठाशी कार्यसंबंध कार्यरत करुन आदर्श कार्यपध्दतीचा पाठपुरावा करण्यांत मग्न राहिले.तथापी मूळमठातील प्रस्थापीतांना साहेबाच्या कार्यपध्दतीने समाजांत व्यक्तीगत साहेबच लोकपसंतीला उतरतात व समाजमनांत साहेबांचा प्रस्ताव प्रथम पसंतीचा ठरतो ही बाब साहेबां बद्दल व्यक्तीगत दु:स्वास वाढत रहाण्यास कारणीभूत होत राहिली. मूळ मठाच्या प्रस्तापीतांच्या सुमार कार्यपध्दतीला आजवर मिळत असलेल्या श्रेणीचा दर्जा घसरत होता व साहेबांच्या योगदानाची श्रेणी मान्य करण्याची प्रस्थापितांची तयारी नव्हती.ही बाब स्पष्ट

झाल्यावर साहेबांनी आपल्या अनुयायी आश्रमाचा मूळ मठाशी असलेल्या कार्यसंबंध खंडीत करुन आपल्या अनुयायी आश्रमाच्या माध्यमातून समाजाभिमुख व परिवर्तनशील विज्ञानयुगांला सामोरे जाणारे स्वतंत्र विचार दिले. आपल्या अुनयायी आश्रमातील समाजाभिमुख शिकवणूकीचा वारसा लाभलेले आमचे साहेब आज शेतीसाठी व शेतकऱ्यासाठी सतत जागृत राहून वास्तवाशी फारकत न घेता धडपडणारा नेता,साहित्य-संस्कृती व इतिहासाची जाण असलेला नेता, मराठी विषयी आस्था असणारा नेता, विज्ञान प्रेमी व आभ्यासू नेता, खेळ स्पर्धेतील कुशल किक्रेट प्रशासक, राज्याच्या सर्वस्थरातून ज्ञात असलेला नेता, चेतन विश्वांत सर्वांना कुतूहल असलेला नेता, निगर्वी, संयमी, विवेक व विचारांशी अखंड साथ करणारा नेता अशा विविध रुपात समाजमनांत स्थान मिळवले आहे. मनोधैर्य व संयम ही साहेबांची शक्ती आहे हे चेतन विश्वांत सर्वमान्य झाले आहे. आपल्या अनुयायी आश्रमाची वाटचाल व अध्यनातील परिवर्तन हे विज्ञान युगाशी व्यवहार्य बदल स्विकारत पुर्वी प्रमाणेच समाजातील अव्वल श्रेणीक्रम राखून आहे. साहेब प्राप्तपरिस्थीतीवर अविरत प्रयत्नशिल आहेत. तथापी प्रचलीत अप्रीय सामाजीक व्यवस्था दुरुस्तीच्या कामांत अनेक अडथळे येत आहेत.

पत्रांत नमूद केलेली सामाजीक प्राप्तपरिस्थीती पहाता

माझ्या सारख्या अनुयायी आश्रमातील प्रशिक्षण पूर्ण केलेल्या अनुयायाने सामाजिक विकास परिर्वनाला गती देणाऱ्या कोणत्या कार्यक्रमाला प्राधान्य द्यावे जेणेकरून माझे योगदान प्रभावी ठरेल. सामाजीक,आर्थीक, शिक्षण, शेती, रोजगार, नवनिर्मीती यातील कोणता कार्यक्रम प्राधान्याने कार्यरत केल्यास इतर कार्यक्रमाला पूरक ठरेल याबाबत आपले मार्गदर्शन मिळावे ही नम्र अपेक्षा.

आपले मार्गदर्शन प्राप्त झाल्यावर आपल्या अनुयायी आश्रमातून प्रशिक्षण घेवून प्रशिक्षीत झालेल्या व आज प्रशिक्षण घेत असलेल्या अनुयायांच्या एकत्रीत महासभेत मांडून अंमलबजावणीच्या गठीत समीतीच्या माध्यमातून प्रारंभ करता येईल .

उत्तराच्या अपेक्षेत

आपला आज्ञाधारक

धाकट बाळ



# "थोरले साहेब
## पुण्यस्मृती अभिवादन"

बाळासाहेब सांकपाळ

अनुयायी आश्रमातील प्रशिक्षण पूर्ण करून आपले कर्मकर्तव्य पार पाडण्याकरिता समाजांत समाजाभिमुख कार्यक्रमांचे तपशील विषद करतांना प्रबोधनांतील कोणत्या विषयाला प्राधान्य द्यावे या स्व. यशवंतरावजीनी अनुयायी आश्रमातील अनुयायांस सूचनेच्या स्वरूपांत मार्गदर्शन केले आहे. स्व. यशवंतरावजींनी मार्गदर्शन करताना प्राचिन व त्यानंतरच्या

समाज जिवनाची रचना व व्यवहार याची माहीती सांगतानाच सुसंस्कृत नागरिक व सुसंस्कृत समाजच आपला विकास सुसह्य जिवनाकरिता उपयुक्त करतो हे सांगीतले आहे. स्व. यशवंतरावजीनी आजच्या कार्यरत नागरिकाला व तरूण पीढीला देशातील प्रत्येकाने स्व:तात कोणत्या कर्तव्याची जाण ठेवली पाहिजे हे सांगून अनुयायी आश्रमांतील अनुयायानी कोणत्या कार्याला प्राधान्य द्यावे असे मार्गदर्शन करणारे पत्र पाठवले आहे. याच पत्राचा बोध आजच्या व उद्याच्या सर्वांनी घेण्याकरिता सादर करत आहे.

यशवंतराव चव्हाण

'विरंगुळा,' इंद्रप्रस्थनगर,

कराड आळी, कृष्णाकाठ शेजारी,

जि.ध्रुवतारा, तारांगण महाराष्ट्र,

नभांगण भारत,

पिन : ०११९८५०२५०११०.

दिनांक : ०५-०३-२०११.

प्रति,

चि. धाकटा बाळ

अनुयायी आश्रम, विरंगुळा परिसर,

कृष्णा काठ, कराड, जि. सातारा,

महाराष्ट्र, भारत.पि.-०२५०११०१९८५०

अनेक आशीर्वाद,

तुझे दिनांक १ जानेवारी २०११ चे पत्र मिळाले. तथापी तीन आठवड्याचे कालावधीनंतर कालच मी विश्वशांती व चैतन्य परिवाराच्या स्वास्थाकरिता ''शोध सुसह्य उद्याचा'' या

परिषदेतील अखंड सहभागातून परतलो. या परिषदेला इकडच्या विश्वातील विद्वान, तज्ञांच्या सहभागामुळे अनेक नवीन-नवीन संकेताचे संभाव्य उगम सामान्यापासून असमामान्यापर्यंत पोहचण्यास या परिसंवादाचा निश्चीत उपयोग होईल असा मला विश्वास वाटतो.

तुझ्या पत्रातील तपशीलामुळे मला तुमच्या सान्निध्यातील वास्तव्याचा भूतकाळ नजरेसमोर आला. पारतंत्र्यातून स्वातंत्र्यांत आलेल्या माझ्या पीढीला समाजविकासाचा ध्यास लागेल असेच संस्कार लाभल्यामुळे समाजविकास व त्याची निश्चीत दिशा ठरवून एकमताने आपसांतील सहकाराची शक्ती वाढवत कामाला सुरवात केली.वास्तविक स्वातंत्र मिळवण्याकरिता एकजुटीने, एकनिर्णयाने व ध्येयसाध्यतेसाठी सामूहिक कृती करण्याची सवय बाणल्यामुळे सर्वच सहकारी नव्या दमाने व नव्या उत्साहाने कामाला लागले होते.

समाजविकास व परिसर विकास याबाबत निश्चीत परिणामाची शाश्वती न वाटणारे निवडक सहकारी कृती आराखड्याबाबत आपली नाराजी व्यक्त करत असत. तथापी

अंमलबजावणीत सर्वांबरोबर असायचे. कालांतराने राज्य व देश विकासाच्या कल्पना भिन्न होत गेल्याने आम्हा सहकाऱ्यांतही स्वतंत्र विचाराने विकासाच्या कल्पना राबवण्याचा आग्रह धरण्याचा परिणाम म्हणून राजकीय वाटचालीत छोटे-मोठे घटक एकत्र येवून देशाने स्विकारलेल्या प्रजासत्ताक राज्यपध्दतीच्या माध्यमातून लोकशाही यंत्रणेद्वारे बहूमताने निवडून येणारे उमेदवार प्रतिनिधीत्व करु लागले. स्वातंत्र संग्रामात निस्सीमकर्म केलेल्या आमच्या वडीलधाऱ्यांनी आम्हावर केलेल्या संस्कारामुळे आमच्यातले बहुसंख्य सहकारी मुख्य राजकीय प्रवाहांत कार्यरत राहून विकासाच्या कल्पना राबवू लागलो. कायदेमंडळातील तरतूदीनुसार बहुमताने होणारे विकास कामाचे निर्णय घेण्याची आम्हाला संधी मिळाली म्हणूनच आम्ही कायदेमंडळांत सत्ताधारी पक्ष व विकास कामाबाबत आमच्या धोरणाशी विसंगत धोरण असलेल्या प्रतिनिधींचा विरोधी पक्ष म्हणून संबोधले जावू लागले.

प्रजासत्ताक राज्यपध्दती स्विकारतांच दोन वर्षांनी पहिली सार्वजनिक निवडणूक होवून आमचा पक्ष राज्यांत व देशांत सत्ताधारी बनला. याच दरम्यान भारत सरकारने पंचवार्षिक

योजनेला प्रारंभ करुन दर पंचवार्षिक योजनेत करावयाच्या कामाचे नियोजन कार्यरत केले. पंचवार्षिक योजनेचा कार्यक्रम व स्थानिक गरजेच्या विकासनिर्मीतीचा कार्यक्रम एकाच वेळी सुरु राहिला. या सातत्यांत सर्व सहकाऱ्यांच्या सहभागामुळे भविष्यांतील गरजांची पुर्तता करणारे कार्यक्रम राबवत गेलो. जे प्रत्यक्ष आहे. त्यांत आधुनिकता आणण्याच्या प्रयत्नातून विकास जाणवू लागला. नव्या प्रकल्पाचे काम हाती घेतल्याने भविष्यांतील गरजा भागवणारी सुविधा निर्माण होणार आहे यावर जनमानसाचा विश्वास बसू लागला. या कालावधीत देशांत भाषावार प्रान्तरचनेचे धोरण स्विकारले गेले. आपल्या व शेजारच्या राज्यांत सिमा प्रश्न व धोरणातील तपशील पुर्णपणे न समजून घेण्यामुळे देशातील महत्वपूर्ण मानल्या गेलेल्या मुंबई शहराचा भाग राज्याला गमवावा लागेल या भीतीने राज्य व केंद्र शासनात दुरावा हेण्याची परिस्थीती निर्माण झाली. तथापी वास्तवातील गरज व नैसर्गीक न्यायाचा विचार करता मुंबई शहर हे आपल्याच राज्याचा भाग राहिल व इतर वादग्रस्त सिमारेषाही शाबूद रहातील असा आम्हांस विश्वास होता म्हणूनच प्रसंगी स्थानिकांचा रोष पत्करुनही सामोपचार व

सबूरीचे धोरण स्विकारले व परिणामी यशस्वी होवून महाराष्ट्र राज्याची मुंबई राजधानी ठेवून यशस्वी झालो. तथापी या मागणी साठी राज्यातील एकसुराची मागणी व त्यासाठी कोणताही त्याग करावयाची तयारी दाखवल्याने क्रेंद्र शासनाकडे वास्तव मान्य करण्यांस आमच्या आग्रहाला मदत झाली. तथापी राज्यातील याविषयीच्या आग्रही प्रदर्शनामुळे काही अप्रिय अंमलबजावणी घडत गेली. तात्पुरती व्यवस्था म्हणून गुजराथसह द्विभाषिक राज्य म्हणूनही काही काळ आपल्याला काम करावे लागले. कालांतराने महाराष्ट्र राज्याची निर्मीती झाल्यावरच आपण आपल्या विकास कामाला सुरवांत करु शकलो.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मीती नंतर सामाजिक सांस्कृतीक, औद्योगीक , शैक्षणीक आघाडीवर आपण एकजुटीने कामाला गती देण्यामुळे महाराष्ट्र हे देशांत अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जावू लागले. या आपल्या राज्याचे नेतृत्व करण्याची संधी मला मिळाली. नंतर केंद्र शासनांत कार्यरत असता राज्यातील विकासाच्या निश्चीत केलेल्या आराखड्याची अंमलबजावणी योग्यरित्या चालू आहे, हे माझे सहकारी व अनुयांयांच्या

सहभागाने होत असल्याने सातत्य राहीले. माझे सहकारी व अनुयायी माझा शब्द प्रमाण मानून आपली कार्यपध्दत ठेवत विकास कामांत कार्यरत राहिले म्हणूनच तू मानलेला "महाराष्ट्रचा सुवर्ण काळ" हा मी किंवा इतरानी मान्य करावा असाच आहे.

आपण मानत असलेल्या महाराष्ट्राच्या सुवर्ण काळांतील विकासाचे परिणाम जाणवायला लागताच "सुबत्ता लाभलेल्या कुटुंबातील शेतकरी शेतातील काम करताना सुस्त होत जातो किंवा काही प्रमाणांत सुबत्तेचा अभिमान वाढीला लागतो त्याप्रमाणे आमच्याच सहकाऱ्यातून काहींच्या अभिमान, अहंमपणा व महत्वकांक्षा वाढत जावून या सर्व एकत्रीत विकास परिणामाचा धनी मीच का होवू नये ? या विचारांत राहून कारभारी होण्याची स्वप्ने पाहू लागला. काहीसा असाच परिणाम देश पातळीवरही वाढीला लागला व परिणामी प्रस्थापीताकडून होणाऱ्या कामातील दुर्लक्षीत राहून गेलेल्या चुका शोधण्यांत नावांजलेल्या समाजसेवकांच्या शक्तीचा शक्तीपात होत राहीला. काही महत्वाकांक्षी समाजसेवकानी तर मुख्य मठापासून फारकत घेवून स्वतंत्र मठ उभारला. याच नवीन मठ उभारणीच्या कामाला ज्यांना

समाजसेवक ही उपाधीसुध्दा नव्हती तथापी भविष्यांत समाजसुधारक होण्याची पात्रता होती त्यांनीही लहानसहान स्वतंत्र मठ उभारले. स्वातंत्रपुर्व काळांत मोजकेच मठ होते व त्यांना स्वतंत्र विचारदिशा होती. तथापी नव्याने निर्माण होणारे मठ हे व्यक्ती केंद्रीत होवून समाज मन विस्कटत गेले. या प्रक्रियेत केवळ नवे-नवे मठ होत राहिले असे नव्हे तर नावंजलेल्या मठातील प्रस्थापितांनी जेष्ठ मठाधिपतीना बाजूला करुन संपूर्ण मठाची कार्ययंत्रणाच आपल्या ताब्यांत घेतली. बाजूला काढलेल्या मढाधिपतीनी जीवनभर अवलंबलेल्या सामोपचार व वितंडवाद झिडकारुन अलिप्त राहून पहाणे व प्रसंगी मौन धारण करणेच पसंत केले. याच दरम्यान काही तरुण प्रस्थापीतानी कोणालाच बरोबर न घेता मूळ मठाच्या कार्यप्रणालीशी फारकत न घेता आपला स्वतंत्र परंतू उत्साही मठ सुरु केला. वरील प्रक्रिया घडत असता मी स्वत: तुमच्याकडेच वास्तव्यस होतो. मी स्वत:ही काही काळ सर्वच कार्यप्रणाली पासून अलिप्त रहाव्या लागल्याच्या अनुभवाचा धनी होतो.

दरम्यान या विश्वातील प्रवेशाची वेळ जवळ येत होती व

धर्म पत्नीने निरोप घेवून येथील आमच्या निवासाची, आश्रम परिसराची आवरा-आवर करण्याकरिता स्थलांतर केले. माझ्या स्थलांतरापुर्वी भोवतालच्या सर्व अनुयायांना मूळ मठाच्या अनुयायांत सामील होण्याच्या आदेश देवून त्यांच्या स्वकर्तत्वाचा मार्ग मोकळा केला. तथापी काही होतकरु व आत्मविश्वास कर्त्यांनी आपला मठ स्वतंत्रपणे कार्यरत ठेवून त्याला कर्तत्वाची साथ देत स्वतंत्र बाणा राखला. या तरुण अनुयायांचे नेतृत्व करणारेच आज तुमच्या मठाचे कारभारी आहेत. स्थलांतरापुर्वी त्यांना मी तसे आदेशच दिले होते कि, कोणत्याही ठिकाणाहून या आपल्या अनुयायी आश्रमाचे कारभारीपण आजवरच्या वाटचालीप्रमाणेच सातत्य राखून चालू ठेवावे. आणि ते सर्व मी अपेक्षील्या प्रमाणे सुरु आहे हे तुझ्या पत्राने अधोरेखीत झाले आहे. आजपावोतो आपल्या अनुयायी आश्रमाच्या कार्यकक्षा व समाजाभिमुख कार्यपध्दती आधुनिकतेच्या परिवर्तनानुसार परिवर्तीत होत गेली असणार यावर माझा विश्वास आहे. या विवेचनांत वापरलेला ''मठ'' हा शब्द राजकिय पक्षांकरिता वापरला आहे हे आतापर्यंत तुझ्या लक्षांत आलेच असेल.

या प्रस्तावनेतून आज तुझ्या करिता लिहित असलेल्या पत्राला ''नमनाला घडाकर तेल'' या विधानाची सलगी वाटेल. तथापी तुझ्या सर्व पत्रात ''त्या'' काळातील परिस्थीची ठेवण असल्याने त्या सर्व बार्बीची पाश्वभूमी स्पष्ट करणे गरजेचे वाटले.

तुझे पहिले पत्र वाचून आनंद व संपर्क समाधान वाटले. आताचे पत्र वाचून आश्चर्या बरोबरच वाईट वाटले. मी स्वत: तुमच्यांत वास्तव्यात असे पर्यंत तू दिलेल्या तपशीलातील परिस्थीती काहिशी तसीच होती हे मान्य करताना माझ्या राज्यातले, माझ्या देशातले राज्यकर्ते हे सुसंस्कारित असल्याने तात्पुरत्या हेव्याऱ्दाव्यातून बाहेर पडून पुन्हा नव्या जोमाने भावी पीढीला आवश्यक व प्रेरणादायी असणाऱ्या २१ व्या शतकांतील परिवर्तन हे सर्वस्वी समाजाभिमुख असेल अशा वाटचालीला स्विकारतील असा विश्वास होता. माझ्या स्थलांतरा नंतर केवळ १५ वर्षाच्या काळांतील तुझ्या पत्रातील परिस्थीती मला ज्ञात होणयकरिता पुढील दहा वर्षाचा काळ लागला यावरुन आपण सर्वच जण खचून न जाता भविष्याबद्दल आशावादी राहिलात हे भारतीय संस्कृतीला सुसंगतच आहे.

आपला देश पारतंत्र्यात असताना आमच्या पूर्वजांना आपण भोगत असलेले शासन हे आमचे नसून परदेशी इशाऱ्यावर त्यांच्या स्वार्थासाठी चालले आहे हे समजण्यांस अनेक वर्षे गेली होती. माझा देश व माझी भूमी आणि येथे उत्पन्न होणारे सर्व माझ्याकरिता व माझे आहे. म्हणून याचा मालक मीच आहे. मी दुसऱ्याचे निर्णयाने चालणार नाही असा निश्चय व त्याकरिताची पस्थापिताकडे मागणी करत हक्क सांगून स्वातंत्र्याची मागणी दशकाहून दशक वाढत गेली. ही मागणी स्वातंत्र्य मिळे पर्यंत सातत्याने तीव्र होत गेली व शेवटी १९४७ मधे आपण स्वतंत्र झालो.

तुझ्या पत्रांत तूं संबोधलेला सुवर्णकाळांतील सर्वांचाच उत्साह वाखणण्यासारखा होता. तू दिलेल्या १५ वर्षातील तपशीलाशी तुलनात्मंक दृष्टया सुवर्णकाळानंतर १५ वर्षे राजकीय क्षितीजावर आपआपल्या महत्वकांक्षेपोटी राजकीय पुढाऱ्यांच्या कार्यक्षमतेचा शक्तीपात होत राहिला.

हे पाहत असता मी सुध्दा व्यथीत होतो. परिणामी विकासात्मक कामाकडे सर्वांचेचे दुर्लक्ष होत राहिले. दरम्यान

शर्यंत जिंकायचा निश्चय करणारा स्पर्धक स्वत:ची क्षमता वाढवण्याचा प्रयत्न करतो. सक्षम बनण्याची क्षमता नसल्याची खात्री असलेला स्पर्धक प्रतिस्पर्ध्याची प्राप्त क्षमता कमकुवत करण्याचा प्रयत्नांत स्पर्धे करिताच्या तयारीच्या आपल्या वेळेचा शक्तीपात करतो. आपण मानलेल्या सुवर्ण काळानंतर आपल्या अनेक स्पर्धकांनी दुसरा पर्याय स्विकारून आपली व प्रतिस्पर्ध्याची सुसंस्कृंत कार्यपध्दती, विचार, विनय व संयम यांना तीलांजली दिल्याचा प्रत्यय यायला लागला होता. कोणीही ऐकण्याच्या पलीकडे जाण्याने आम्ही काही मंडळीनी परिस्थीबाबत प्रतिक्रीया देण्यापासून मौन बाळगणेच पसंत केले होते. यावरुन तू आजच्या सामाजीक परिस्थीतीचे केलेले वर्णन प्रथमावस्थेत असतानाच माझे स्थलांतर झाले. तथापी स्थलांतरापर्यंत मी परिस्थीती सुवर्णकाळांच्या पूर्वपदावर येईल याबद्दल आशावादी होतो.

तू कळवलेल्या समाज जिवनाचे वर्णन वाचून मी या परिस्थीतीवर चिंतन मनन करण्यांत घालवून तुझ्या चैतन्य विश्वांत परिवर्तनशील वैज्ञानिक समाज जिवनाची आजची गरज या विषयी काही बाबी सुचवण्याचा निर्णय घेतला.

प्राचीन काळापासून मानवाला अन्न वस्त्र व निवारा या प्राथमिक गरजा करिता आपला दिवस व्यतीत करावा लागत असे. परिवर्तनातून या गरजा भागवणारे स्तोत्र निर्माण होत गेले. यातूनच समाजजिवनाची एकत्र, समूहाने व नैसर्गीक कर्तव्य पध्दती बनत गेली. एकत्रीत कार्यपध्दतीच्या अवलंबनातून आपल्या समूहाकरिताच्या सीमा निश्चीत करुन आपल्या कार्यपध्दतीचे सातत्य व गरजेप्रमाणे परिवर्तनाचे मार्ग अवलंबले गेले.या निश्चीत केलेल्या सिमेतून चैतन्य विश्वांत देश निर्माण झाले. यापुढील मानव व त्याच्या कार्यपध्दतीचा इतिहास वाचतांना चिंतन, मनन, ध्यान साधना इत्यादीतून स्थानपरत्वे मानवाचे कर्तव्य ठरवण्याकरिता धर्म ही संकल्पना अमलांत आली. मानव स्वत:च्या गरजेनुसार चेतन विश्वात आपल्या धर्म संस्कारासह स्थायीक होत राहिला. म्हणूनच देशादेशात भिन्न धर्मातून भिन्न संस्कृती, प्रघात उदयाला आले.

याच परिवर्तनातून आपला भारत देश निर्माण झाला. कालांतराने आपल्या देशावरील पारतंत्र, स्वातंत्र्य संग्राम व स्वातंत्र्यप्राप्ती हा इतिहास हा आपण सर्वांनी वाचला आहे.

आता तुझ्या पत्रातील मूळ मुद्यावर मर्यादित काही उपाय सुचवण्याचा प्रयत्न करत आहे.

आपण चेतन विश्र्वात आज समाज जिवन अनुभवत असता सुसह्येते ऐवजी असह्यता अनुभवत आहांत. याचांच अर्थ समाजमनाला असह्यतेचा आजार झालेला आहे. हा आजार नाहीसा व्हावा अशी आपली सर्वांचीच इच्छा आहे. वैद्यकीय भाषेत आजारावर उपचार हाच उपाय आहे. उपचार करायचाअसल्यांस प्रथम आजाराचे निदान करण्याची गरज असते. आपले समाजमन अनुभवत असलेल्या आजाराचे निदान करताना समाजमनाची संस्कृती, संस्कार व सवयी विचारांत घ्याच्या लागतील.

स्वातंत्र्य प्राप्ती नजरेच्या टप्प्यांत असताना सामाजिक व्यवस्था व अन्न-वस्त्र -निवारा इत्यादी सोयी गरजे इतक्या उपलब्ध नसल्याने समाज त्रस्त. शिवाय शिक्षणाच्या गैरसोयी इत्यादीमुळे अशिक्षीत, समाजांत मोजके सुशिक्षीत. पारतंत्र्यामुळे मर्यादित विकास. यामुळे विकास परिवर्तनाला वाव कमी.

स्वातंत्र मिळाल्यावर स्विकारलेल्या प्रजास्ताक राज्यपध्दतीमुळे विकासाचे नियोजन व कालमर्यादा ठरवण्याच्या

वैधानिक पध्दतीतून नियोजन मंडळ व पंचवार्षीक योजना या संकल्पना अस्तीत्वात आल्या. याच माध्यमातून राज्या-राज्यातील स्थानिक विकास आराखडयासह विकासाची नवनिर्मीती होत राहीली.

या वाटचालीत मुख्य घटक होते ते प्रामाणिक शासनाकर्ते, नियोजनकार आणि सुसंस्कारित समाज. विकासाच्या वाटचालीत या घटकांची नितांत आवश्यकता असते. तुमच्या चेतन विश्र्वांत सर्वच देश आपआपल्या परिने विकास करत राहीले व नवनिर्मीतीत रोज नवा आनंद मिळवत गेले. देशा-देशातील निर्मीती विकासाच्या कल्पना व कार्यपध्दती भिन्न असल्या तरी मानवाच्या प्राथमिक गरजा भागवण्यासाठी संशोधनातून मिळणारे विज्ञान शास्त्र विकसीत करुन गरजा सुसह्यतेने पुऱ्या करु शकणाऱ्या यंत्रणेच्या शोधाचे सातत्य अखंड ठेवले.

अविकसीत देशाचा विकास कार्यक्रम राबवताना समाजाला मानवतेचे भान असणे व जिवनमुल्ले आत्मसात करुन आदर्श नागरिक असणे व सामूहिक हिताकरिता सहकार भावना असणे आवश्यक असते. आमच्या पूर्वजांना वरील संस्कार जतन

करताना पुढच्या पीढीला सवय लावून सातत्य सुरु ठेवणारी प्रबोधनाची परंपरा लोककलेच्या किर्तन-प्रवचन व धार्मीक सण व संस्कृतीच्या माध्यमातून लाभत असे. माझ्या पीढीनेही तोच वारसा जपला. हे सत्य तुझ्या चेतन विश्वांत देशातील सद्यस्थितीतील समाजजिवनाची अवस्था स्पष्ट करणाऱ्या तुझ्या पत्रा वरुन स्पष्ट होते.

म्हणूनच सुचवावे वाटते कि, राज्य देश विकास निर्मीतीकरीता सुसंस्कृत समाज निर्मीतीचे काम प्रथम हाती घ्यावे लागेल. समाजाची मानसिकता मानवतावादी, संयमी, विवेक, सौजन्यशील होत नाही तोपर्यंत खरा विकास मानवनिर्मीतीच्या नावावर होवू शकत नाही.

याकरिता, समाजातील, प्रत्येक, मनुष्य उत्तम व आदरणीय संज्ञेला पात्र होणारा, एक दिलाचा सुसंस्कृत समाज बनवण्याकरिता प्राचीन काळापासून परंपरेने जोपासलेल्या संस्कृतीतून प्रबोधन प्रक्रिया हाती घ्यावी लागेल. आपल्या देशांत भिन्न व्यवस्थेच्या भिन्न परंपरा असल्या तरी सुखी व सुसंस्कृत जीवन घडवण्याची व उपभोगण्याची पध्दत भिन्न नाही.

संसंस्कृत समाजमन एक जिनसी बनवण्याकरिता समाजातील प्रत्येक घटकाने आपली संस्कृती, धर्मकर्तव्य, प्रथा, रितीरिवाजातून जतन करताना व्यवहार्य परिवर्तनासह पुढच्या पीढीला त्याचा वारसा द्यावा लागतो. प्रत्येक नव्या पीढीकडून याच बाबींचे अवलंबन होत राहिल्याने समाजातील प्रत्येक घटक व प्रत्येक नागरिक उत्तम नागरिक व उत्तम घटक बनवण्यास मदत होत असे. विज्ञान व परिर्वनशील वाटचालीत ठळक व गतीमान परिणामामुळे संस्कृतीतील मूळ अपेक्षीत परिणामाचे जागी अल्पकालीन, ठळक वाटणारे प्रसंगी पारंपारिक हेतूशी फारकत घेणारे परिणाम नव्या पीढीला मोहीत करु लागतात. समाजातील वेगवेगळया घटकामधून मनुष्यात अशी प्रवृत्ती वाढत गेल्यास स्वार्थामुळे द्वेश-मत्सर वाढीला लागून स्पर्धा, जबरदस्ती, लूटमार व प्रसंगी खून खराबी पर्यंत मजल जावून क्षणीक सुख मिळण्यांत मर्दपणा वाटू लागतो. अशा संघटीत प्रवृत्तीतूनच पुढे समाज व देश विद्यातक शक्ती कार्यरत होतात. याच कारणांनी सुस्कृंत समाजाचे परिवर्तन स्वार्थी, नासमंजस व उपद्रवी वृत्तीत होवून देशविघातक कृतीला प्रोत्साहन मिळत जाते. अशा परिवर्तन

झालेल्या समाजातच प्रामाणिकपणा, नातीसंबंध, देशप्रेम, विकासप्रेम या सर्वांशी फारकत घेतलेला समाज निर्माण होतो. तुझ्या पत्रांत तू आजच्या सामाजीक परिस्थीचा दिलेला तपशील हा अशाच परिणामातून झालेला आहे.

इकडच्या विश्वांत प्रवेश देताना प्रथमता सर्वसाधारण नागरिकत्व दिले जाते. परिपक्व नागरिकत्वासाठी येथील प्रथम केंद्रात अनेक चाचण्या द्याव्या लागतात. विशेष म्हणजे अशा सर्व चाचण्या यशस्वीपणे पार पडल्याशिवाय परिपक्व नागरिकत्व मिळत नाही. त्यामुळे येथील प्रत्येक नागरिकाने येथील समाजव्यवस्थेत सामील होताना परिपक्व नागरिक ही उपाधी मिळवलेली असते.

येथील परिपक्व नागरीक हा स्वत:शी व इतरांशी प्रामाणिक असतो. कोणतीही गोष्ट कृतज्ञतापूर्वक स्विकारतो व गाजावाजा न करता दान करतो. त्याला इतराबद्दल सहानुभूती वाटते व इतरांच्या भावना समजून घेतो. त्याला इतरांच्या दोषापेक्षा गुण अधिक लक्षात येतात. तो अडिअडचणीतही आनंदी राहून धैर्य दाखवतो. तो यशाने हुरळून न जाता साधेपणाने स्विकारतो. तो

दिलेला शब्द पाळतो. तो स्वत:वरील टीका व स्वत:मधील कमतरता खुलेपणाने मोकळेपणाने मान्य करतो. इतरांनी केलेल्या प्रशंसेने गर्वीष्ट होत नाही. तो स्वत:च्या चुका मान्य करतो आणि नित्मसरीपणे इतरांनाच्या कर्तव्याला दाद देतो. गरजवंताला योग्य सल्ला देतो व संकटसमयी त्याच्या पाठीशी उभा रहातो. तो इतरांच्या अडिअडचणींचा विचार करून जमेल तेवढी मदत करतो. तो न्यायपध्दतीने पण इतरांना न दुखविता भाषेचा योग्य वापर करून नाती दृढ करतो. तो इतरांचा कायम विश्वासू रहातो. कोणत्याही प्रसंगात आपला तोल ढळू देत नाही. तो सबबी सांगत नाही. दुसऱ्यासाठी सदैव त्यागाला तयार असतो. तो विजयांत नफा व पराजयांत अविचल, धीरगंभीर असतो.

अशा परिपक्व नागकिरांचा बनलेला सुसंस्कृत समाज सामुहिक हिताचे निर्णय घेवून सहकारातून सामुहिकपणे यशस्वी करण्याची परंपरा राखून आहे.

येथील समाजव्यवस्थेचे नियमन करणारे परिपक्व नागरिकांनी पाळावयाचे नियम व कर्तव्य करण्याकरिता इकडील बहूमान्य प्रतिष्ठीतांच्या वर्षातून तीन वेळा सामुहिक चर्चासत्र

आयोजित करून केलेल्या कामाचा आढावा घेवून पुढील योजना करण्याची प्रथा आहे. अशा चर्चा सत्रांत एखाद्या विषयांवर मतभिन्नता असेल तर त्यांची नोंद घेतली जाते. तथापी अंमलबजावणी सामुहिक निर्णयानुसार घेण्याची पध्दत आहे. अंमलबजावणीत मतभिन्नता नोंदवलेले सदस्य सुध्दा सहभागी असतात. या शिखर चर्चा सभाच्या बैठकीतील निर्णय या देशातील सर्व विभाग व उपविभाग यांना बंधनकारक असतात. तथापी स्थानिक गरजेनुसार त्यांना आपले स्वत:चे स्वत:च्या विभागापुरते स्वतंत्र नियम व कर्तव्य ठरवता येतात. सुसंस्कृत व सर्व नागरिकांना केंद्रस्थानी मानून नियम व कर्तव्याचे नियम करत राहिल्याने भेदभाव न होता समानता जोपासली जाते. येथे उच्च - निच भेदभाव ठरवण्याची पध्दत अस्तित्वात नसून गुणवत्तेनुसार श्रेणी प्रदान करण्याची प्रथा आहे.

येथील उद्योग धंद्यातील उत्पन्नांत देशाच्या प्राथमिक गरजाकडे प्राधान्याने लक्ष दिले जाते. प्रत्येकाला श्रेणीनुसार काम दिल्याने उत्पान्नाचा दर्जा राखून उत्पादन होते व प्राप्त श्रेणीला योग्य तो मोबदला दिला जात असल्याने वापरातील मनुष्यबळ समाधानी

असते. इकडेही कामगारांच्या संघटणा कामगाराइतक्याच व्यवस्थापनाच्या गरजा लक्षातं घेवून सहकार्याच्या आदान प्रदान प्रक्रियेतून सातत्य राखून आहेत. श्रेणीयोग्य कामाची संधी न मिळू शकलेला परिपक्व नागरिक इतर उद्योगांत प्राप्त श्रेणीतील लाभलेल्या सक्षमतेनुसार काम स्विकारतो व शक्य असलेली व्यक्तीगत प्रगती करतो. त्यामुळें इकडे बेरोजगार नागरिक क्वचितच आढळतात. नव्हे तर उत्तम व्यवस्थापनामुळे सर्वांना श्रमाची योगदानाची संधी मिळते.

येथील नागरिक हा परिपक्व असला पाहिजे. हा कटाक्ष असल्यामुळे प्रथम प्रवेशांतच त्याचा अध्ययन आश्रम निश्चीत करून अध्ययन पूर्ण करणे सक्तीचे व सुसह्य अध्ययन आश्रमाची पूर्तता केल्यामुळे आणि अध्ययन सक्तीचे असल्यामुळे येथील परिपक्व नागरिक साक्षर असतो. त्याच्या शिक्षणाची श्रेणी त्याचे बुध्दीमतेवर अवलंबून असते.

इकडच्या जलसंपदेचे योग्य नियोजनाचे सातत्य राखले जात असल्याने कृषी उत्पादनातून अन्नधान्याचा मुबलक पुरवठा होत असतो. शेती धंद्यातील नागरिकांना उत्पादनाचा योग्य

मोबदला मिळत असल्याने आपल्या कार्यक्षेत्रातील उत्पादनांत ते सातत्य राखून असतात.

सार्वजनीक सेवा व्यवस्थेबाबत इकडे खूपच दक्षता घेतली जाते. प्रत्येक सेवा व्यवस्थापनांत पात्र व तज्ञांची नियुक्ती केलेली असल्याने इकडचा सेवा दर्जा उत्तम प्रतीचा सातत्य राखून असतो.

त्याचप्रमाणे येथील समाजाच्या गरजेनुसार घेतलेल्या समाजाभिमुख निर्णयानुसार करावयाच्या नवनिर्मीतीत सहकार भावनेने सामुहिक सहभागाने नवनिर्मीतीत यश मिळवतात. येथील न्यायव्यवस्थचे वैशिष्ट्ये म्हणजे वास्तवावर आधिरित न्यायाबाबत कोणत्याही स्थरावर तडजोड स्विकारली जात नाही. अन्याय झाल्याची प्राथमिक खात्री झाल्या शिवाय येथील विधीतज्ञ न्यायालयांत खटला दाखल करण्यांस परवानगी देत नाहीत. त्यामुळे येथील नागरिक न्यायव्यवस्थेत दिलेला निवाडा स्विकारून नियमीत सुसह्य जिवनांत रहातो.

इकडच्या विश्वातील देशांत शेजार धर्म पाळला जातो. प्रत्येक राष्ट्र आपल्या निश्चीत ठरलेल्या सिमारेषेतील क्षेत्रातच आपले राष्ट्रीय कार्यकर्तव्य पार पाडत असतो. दरवर्षारंभी अनेक

राष्ट्राकडून एकमेकांना मदत हवी असल्यांस कळवण्याची विनंती करणारी पत्रे, सक्तीने एकमेकांना पाठवली जातात व आपसातील सौदार्थ्याचे सातत्य राखले जाते.

येथील संशोधन प्रक्रिया इतकी प्रगत झालेली आहे कि येथील विश्वाहून वेगळे विश्व असल्याची प्रचिती घेवून अनेक समाजाभिमुख शोध प्राप्त केले आहेत. याचबरोबर समाजाकरिता त्याज्य बाबींचा नायनाट करण्याचा शोधही लावल्याने सामाजीक संतुलन राखण्याचा यशस्वी प्रयत्न केला जात आहे. सध्या येथील संशोधन प्रक्रियेत या विश्वाहून वेगळ्या कल्पना अवकाश विश्वांत सुखाचे पर्वत व प्रगतीचा सागर असल्याच्या संभावनेचा आधार घेवून यांत शोध मोहीम यशस्वी करून नवा विक्रम करण्याची तयारी सुरू आहे.

वास्तविक तुझ्या पत्राला उत्तर लिहिण्यास सुरवांत करून चेतनविश्वाच्या निर्मीतीपासून प्राचिन व अलीकडील काळाच्या इतिहासातील परिवर्तनासह तुमच्या वास्तव्यांत असता मी अनुभवलेल्या बाबी सांगतानाच तुझ्या पीढीच्या सहवासातील उत्साही व प्रेरणादायी काळाच्या आठवणीही सांगितल्या. इकडे

लिहीण्याची, वाचनाची संधी दुर्मीळतेने मिळते कारण इकडील सर्वांनीच इथल्यापुर्वीचे माहित करून घेतलेले असते. मी मात्र आज मनसोक्त मनमोकळे करताना बऱ्याच बाबी तुला कळवत आहे. या सर्व विवेचावरून तू या घडीला काहीसा नाराज अससील कारण तुझ्या पत्राचा मुख्य हेतू या पत्राद्वारे दृष्टीक्षेपात आलेला नसेल. निराश होवू नको. तुला हवे असलेले मार्गदर्शन सुचनाद्वारे करणारच आहे. तथापी येथील समाजव्यवस्थेचा वास्तव तपशील वाचून तुलाही अशाच समाजव्यवस्थेची अपेक्षा वाढली असणार.

तुझ्या पत्रांत आपल्या राज्यातील, देशातील आजच्या समाजजिवनाचा तपशील व त्यामुळे असहाय्यता वाढल्याची खंत व्यक्त झाल्याने आपल्या अनुयायी आश्रमाच्या माध्यमातून दिलेल्या अध्ययनाशी ते विसंगत असल्याचेच जाणवत असेल.

एकूणच `येथील समाजव्यवस्थेची रचना तुझ्या माहीतीकरिता सांगून झाल्याने आपण मुख्य मुद्याकडे वळू.

चि. बाळ, प्राप्तपरिस्थीतीत तुझ्या चेतन विश्वातील समाजव्यवस्थेत स्वार्थ, भ्रष्टाचार, द्वेष भावना, धर्मा - धर्मातील वैर, अनावश्यक श्रध्देमुळे जोपासलेला जातीवाद यामुळे येथील

समाजव्यवस्थेशी विसंगत असल्याचे स्पष्ट होते. वास्तविक आमच्या पूर्वजानी अनेक माध्यमातून दिलेल्या संस्कारातून व प्रबोधनातून सर्वगुणसंपन्न नागरिक बनण्याकरिता नव्या पीढीला सतत सातत्य राखून प्रयत्न केल्याचा आपला इतिहास आहे. हीच परंपरा पुढे सुरू ठेवल्याने आम्ही बऱ्याच प्रमाणांत यशस्वीसुध्दा झालो. म्हणूनच स्वातंत्र्य प्राप्तीनंतर समाजाला पुर्वीच्या असुविधा नाहीशा करून नवनिर्माणाला गती देवू शकलो होतो. तथापी क्षणीक मोहाचा प्रभाव वाढून व संस्कार आणि प्रबोधनाची प्रथा खंडीत होवून त्या जागी करमणुकीच्या नांवाने अप्रीय व अनावश्यक परिवर्तन झाल्याने समाज अनेक व्याधींनी त्रस्त झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

आपल्या अनुयायी आश्रमांतील अध्ययनांत सुसंस्कृत नागरिक बनण्यास उपयुक्त अध्ययनातच प्राधान्य राखण्याचा माझा आग्रह त्याचसाठी होता.

याकरिता आजही आपल्या अनुयायी आश्रमांतील अध्ययनाचा दर्जा टिकवणे व त्याचे सातत्य राखणे हे प्रत्येक अनुयायाचे पवित्र कर्तव्य असेल.

याकरिता प्रथम देशातला नागरिक हा आदर्श ठरावा, प्रशंसनीय, व उत्तम मनुष्य ठरावा व असे ठरण्यांत असणारे सामूहिक सुख, समाधान,भविष्याची पुर्तता, सुसह्य जिवन हा परिणाम असल्याचे स्पष्ट व्हावे व यातूनच सुसंस्कृत समाजाची पुन्हा निर्मीती होवून. देशप्रेमी, आदर्श नागरिक, सुसंस्कृत समाज निर्माण होवून देशाचा सामूहिक विकास व्हावा. असा आदर्श व सुसंस्कृत समाज पुन्हा नव्याने कार्यरत करताना मनुष्य स्वभावांत सुस्कंकृत नागरिक, देशप्रेमी नागरिक, मानवता, समता, परोपकारी, परस्पर सहकार करणारा संस्कृतीचा, वडीलधाऱ्यांचा, परंपरेचा, धर्म कर्तव्याचा आदर करणारे परिवर्तन प्राधान्याने अपेक्षीत आहे.

अन्यथा प्रचलीत कार्यपध्दती व समाज जिवन असेच पुढे चालू राहिले तर आपल्या जिवनमुल्यांची अवनती होवून आज असलेल्या अपप्रवृत्तीत वाढच होत राहून स्वतंत्र भारताच्या सार्वभौमत्वाला अपाय होईल.

चि. बाळ, तु तुझ्या पत्रातून व्यक्त केलेली समाजीक परिस्थीती मी या विश्वात अनुभवत असलेल्या परिस्थीशी विसंगत आहे हे आपण मान्य करु. तथापी मी येथे अनुभवत असलेल्या येथील समाजीक परिस्थीतीची निर्मीती व त्याचे सातत्य राखणारी आपली समाज व्यवस्था अनुभवण्याकरिता काही कठोर निर्णय व त्यांची अंमलबजावणी आवश्यक आहे. यांत आदर्श व परिपक्व नागरिक बनवण्याकरिता उगवत्या पीढीतील नवतरुणांना सुसंस्कारीत करणारी आपल्या संस्कृतीतील परंपरा कुटूंब व्यवस्थेपासून सामाजीक सहभागापर्यंतच्या व्यवस्थापनांत प्रबोधनाद्वारे होवू शकते. याचा अनुभव आपल्या पुर्वपीढीपासूनच्या इतिहासात आहे. म्हणून सुसंस्कार व त्याकरिताचे प्रबोधन याचे सातत्य हाच यशस्वीतेकडे जाण्याचा प्रथम कार्यक्रम असावा.

याच बरोबर नागरिकाच्या प्रगतीत नवनिर्मीतीच्या कार्यपध्दतीत निसर्गाचे संतूलन जपण्याकरिता पर्यावरणाचे नियमन, निसर्गातून उपलब्ध साधनाचा काटेकोरपणे वापर, उपलब्ध नैसर्गीक संपत्तीची नासाडी काटाक्षाने टाळणे, भविष्याच्या गरजा ओळखून दूरगामी नियोजनाचा कटाक्ष पाळणे, देशातील

उपलब्ध जलसंपत्तीचे गरजेच्या ठिकाणपर्यंतची उपलब्धता अवलंबणे, याबाबत कै. के.एल.राव, यांनी प्रस्तूत केलेल्या नद्याजोडणी प्रकल्पाचा प्रस्ताव अजामावणे उपयुक्त ठरु शकेल. याच बरोबर समाजव्यवस्थेच्या परिवर्तना नुसार, गरजेनुसार बदल करण्याची मानसिकता निर्माण करणे यांत प्रचलित न्याय व्यवस्थेचा अग्रकमाने विचार करणे हा कार्यक्रम आवश्यक राहील.

वर सुचवलेल्या आदर्श व परिपक्व नागरिकाच्या निर्मीतीकरिताचा प्रबोधन कार्यक्रम हा आपल्या अनुयायी आश्रमातील प्रत्येक प्रशिक्षीत अनुयायाने अवलंबवणे कर्म कर्तव्य रहावे. नागरिक व समाजव्यवस्था आदर्श सुसह्य जीवनाकरिता उपयुक्त ठरावी याकरिताचे प्रबोधनांती कार्यक्रम राबवणारी मानसिकता कार्यरत करावी. यातूनच पुन्हा आपण राज्याच्या देशाच्या सुवर्णकाळाचा अनुभव घेत सातत्य राखण्याचे महत्व जाणू शकाल.

चि. बाळ, वरिल सुचना-अपेक्षा तू, तुझे सर्वसहकारी अनुयायी आपल्या अनुयायी आश्रमातील सर्व प्रशिक्षणार्थी यांनी अमंलबजावणीच्या माध्यमातून राज्यातील देशातील

समाजव्यवस्थेला दिशा यावी ही माझी अपेक्षा.
ही अपेक्षा सर्वश्रुत होईल याची पुर्तता करण्याचे भान,जाण,सामर्थ तुम्हा सर्वांना लाभावे या अमृत शुभेच्छा.

आपण हा कार्यक्रम आजच प्रारंभ करुन यशस्वीतेकडे जाण्याची गती सातत्याने वाढवत जाल व परिणामी राज्यांत देशांत सुसह्य समाज जिवनाचा अनुभव मिळेल याची खात्री वाटते.

इकडच्या विश्वात संशोधन क्षेत्रांत सुरु असलेल्या सुखाचे पर्वत आणि प्रगतीचा सागर या शोधमोहिमेतील परिसंवाद व संशोधन सहाय्य करण्याकरिता निवडलेल्या प्रतिनिधी मंडळात माझा समावेश असल्याने आजच मला नव्या जिवनाची सुखांत करण्यांचा नवा अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. या शोध मोहिमेच्या यशस्वीतेचा परिणाम कालांतराने तुला कळविनच. आपण सर्वजण आजपासून हाती घेतलेल्या कार्यक्रमाची प्रगती कळवण्याची घाई करु नका. कारण मी नव्या कामगीरीवर निघण्याची आजच तयारी करत असून परतण्याचा काल अमर्याद असल्याने त्वरीत संपर्क अश्यक्य वाटतो. तथापी आपण सर्वांनी आपले काम सातत्याने सुरु ठेवावे व माझ्या उपलब्धतेनुसार मला तुझ्या पत्रा द्वारे चांगल्या परिणामाची माहीती मिळेल या अपेक्षेत

**तुम्हा सर्वांचा**

**यशवंतराव चव्हाण**